२८ डिसेंबर १९६८ । मूल्य ४० पैसे

# माणूस

राष्ट्रवाद्यांनी फुटीरवाद्यांचा समाचार अवश्य घ्यावा,
पण त्याचबरोबर दारिद्र्यात खितपत पडलेल्या समाजाच्या उत्कर्षाच्या भरीव
योजना त्यांनी आखल्या नाहीत तर ह्या समाजाला राष्ट्रीय दृष्टिकोण
देण्यात ते कधीच यशस्वी होणार नाहीत. आणि जोपर्यंत
हे होत नाही तोपर्यंत शस्त्रसामर्थ्य किंवा मूठभर
सुशिक्षितांचा राष्ट्रवाद ह्या फुटीर चळवळी
कायमच्या उपटून टाकूच शकणार नाही.

—'मुंबई समाचार'



# रा जा शि व छ त्र प ति

ब. मो. पुरंदरे । मूल्य रुपये बेचाळीस

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : एकतिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक
दिलीप माजगावकर,
सौ. निर्मला पुरंदरे

भारत सरकार,
कृषि मंत्रालय,
लखनौ

स. न. डिसेंबर, ४

आपल्या दिनांक २३-११-६८ च्या माणूसच्या अंकात चंद्रकांत लिखित ट्रॅक्टर आणि बॉयलर ह्या लेखावर काही महिती पाठवित आहे.

पान ११ वर श्रीगंगानगर येथे २६ लाख टन बीट साखरेचे उत्पान झाले नसून ६०४ क्वींटल बीट साखरेचे उत्पादन झाले आहे.

पान ११ वर ह्या तंत्रास आय. आय. एस. आर. ८३२६ लिहिले आहे ते आय. आय. एस. आर. ८६२६ आहे व १७ महिन्यांच्या एवजी १०-१२ महिने आहे. तरी आपण ही दुरुस्ती पुढच्या अंकात केल्यास शेतकरी वर्गास खरी माहिती मिळेल व त्यांना उपयोगी ठरेल. जर ह्या विषयावर अधिक माहिती वाचकांना हवी असल्यास ती आम्ही आपणास पाठवू.

— आर. आर. पंजे

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

मुंबई समाचार

सु. ल. सोमण

# आयाराम-गयाराम

भारताचे गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाणांनी अलीकडेच पक्षांतरावर कडक टीका केली. ह्या विषयावर आपलं मत देण्यासाठी नेमलेल्या संसद सदस्यांच्या समितीनेही ह्याबाबत तीव्र टीका केली आणि पक्षांतर करणाऱ्या सदस्यांविरुद्ध उपाय काय योजले जावेत ह्यावर चर्चा केली. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर बहुसंख्य उत्तर भारतीय राज्यांतून जी अस्थिर राजकीय परिस्थिती निर्माण झाली आणि 'आयाराम–गयारामां'चं जे प्रस्थ वाढलं त्यामुळं ह्या प्रश्नावर गंभीररीत्या विचार करण्याची पाळी आली व संसद सदस्यांचीही समिती नेमली गेली. ह्या समितीच्या शिफारशी बाहेर येण्यापूर्वीच, हरियानात मध्यावधी निवडणुका झाल्या. ह्या निवडणुकांच्या वेळी काँग्रेस व जनसंघ ह्यांनी 'आयाराम–गयाराम' मंडळींना तिकीट नाकारून एक आचार–संहिता निर्माण केली होती व समितीच्या कार्यवाहीत सुलभता आणायचा प्रयत्न केला होता. परंतु समितीचे खल चालू असताना अनेक मंत्री, राजकीय पुढारी व समाजधुरीण ह्या प्रश्नांवर आपापली मतं व्यक्तवीत असतानाच पुन्हा एकदा हरियानांत धमाल उडाली आणि अवघ्या सहाच महिन्यांपूर्वी अस्तित्वात आलेलं बन्सीलाल मंत्रिमंडळ धोक्यात आलं. हे मंत्रिमंडळ धोक्यात आलेलं दिसताच, ज्येष्ठ काँग्रेस मंत्र्यांचे पक्षांतरावरील कटू उद्‌गार, काँग्रेसाध्यक्ष श्री. निजलिंगप्पांची शिस्तभंगाविरुद्ध कडक उपाय योजण्याची वक्तव्यं, ह्या साऱ्यांना सोयीस्करपणं बगल देऊन, काँग्रेस श्रेष्ठींनी श्री. बन्सीलाल ह्यांना मंत्रिमंडळात वाढ करायला, काँग्रेस सोडून संयुक्त आघाडीत सामील झालेल्या पंधरा आमदारांना आमिष दाखवून सत्ताधारी पक्षात खेचून घ्यायला पूर्ण मुभा दिली; आणि एका परीनं, पक्षांतराविरुद्ध उचललं गेलेलं स्वपक्षाचं पाऊलच, काँग्रेस श्रेष्ठींनी छाटून टाकलं. देशांतल्या सर्वांत मोठ्या व सत्ताधारी पक्षाची आचार-संहिता पाळण्याची ही तयारी तर अन्य पक्षांबद्दल काही बोलायलाच नको! अर्थात् संसद सदस्य समितीने केलेल्या थोड्याबहुत शिफारशींची काय वाट लागणार हे सांगायला ज्योतिषी नको! ढीगभर बेशिस्त कार्यकर्त्यांपेक्षा मूठभरच निष्ठावान व शिस्तबद्ध कार्यकर्ते असले तर उत्तम, पण पक्षातली बेशिस्त मी समूळ उखडून लावीन, असं श्री. निजलिंगप्पा म्हणतात ते निरर्थक वाटतं; टाळ्यांसाठी केलेली व्याख्यानबाजी वाटते ती ह्यामुळेच!

१९६७ च्या निवडणुकांत, उत्तर भारतात ज्या थोड्याशाच प्रांतांमधून

काँग्रेसला बहुमत लाभलं, त्यात हरियाना हा एक प्रांत होता. प. पंजाबच्या विभाजनातून निर्माण झालेल्या ह्या हिन्दी भाषिक राज्यात काँग्रेसला बहुमत मिळेल असं मुळात कुणाला वाटलं नव्हतं पण ते मिळालं व श्री. भागवत दयाल शर्मांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस मंत्रिमंडळ हरियानात अधिकारारूढ झालं. भागवत दयाल हे पंजाबचे माजी मुख्य मंत्री. कै. प्रतापसिंह कैरॉं ह्यांच्या पठडीतले. प्रांतीय पातळीवर काँग्रेसचे ठिकठिकाणी काही अहंमन्य दुढ्ढाचार्य स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झाले. हरियानात श्री. शर्मांचं स्थान काहीसं तसंच होतं. हरियानाच्या राजकारणात जाट जमातीचं एक खास स्थान आहे. काहीशा आक्रमक असलेल्या ह्या जमातीविरुद्ध एकत्रितपणे साधारणत: हरियानातलं राजकारण खेळलं जातं. श्री. शर्मा हे अशाच पठडीतले राजकारणपटू ! परंतु त्यांच्या मंत्रिमंडळाला, जाट जमातीची सहानुभूती व विरोधी पक्षियांचा स्वाभाविक पाठिंबा ह्यांच्या जोरावर शह देण्यात त्या वेळचे फुटीर काँग्रेसजन श्री. राव बिरेंद्रसिंग यशस्वी झाले. सिंग मंत्रिमंडळात, राव बिरेंद्रसिंगाची सर्वांची मर्जी बाळगता बाळगता त्रेधातिरपीट उडाली. त्यांचं मंत्रिमंडळ अफाट वाढलं आणि तरीही सर्वांचंच समाधान अशक्य होऊन, ते मंत्रिमंडळही कोसळलं. नंतर पक्षांतराची एवढी साथ वाढली की, हरियानात नक्की कोणत्या पक्षाला बहुमत आहे हे ठामपणं सांगणं कुणालाच शक्य नव्हतं. रोजच्या रोज पारडं वरखाली होत होतं आणि शेवटी राज्यपाल श्री. चक्रवर्तींनी । राष्ट्रपती राजवटीसाठी सल्ला दिला !

मध्यावधी निवडणुकांत, पुन्हा काँग्रेसला बहुमत मिळालं व त्यातसुद्धा छत्तीस म्हणजे जवळ जवळ दोन तृतीयांश आमदार शर्मा गटाचे होते. शर्मांविरुद्ध काही आरोप असल्यामुळे त्यांना तिकिट नाकारलं होतं; परंतु त्यांची रवानगी राज्यसभेत केली गेली होती. साहजिकच, स्वत:च्या गटाचं वर्चस्व असल्यानं शर्मांनी सत्तास्थानाची अपेक्षा बाळगली. परंतु, त्यांना राज्य पातळीवरील राजकारणापासून दूर ठेवायचा चंगच श्रेष्ठींनी बांधला असावा. विधान सभेच्या सदस्यालाच, मुख्य मंत्रीपद मिळावं असं ठरवून, शर्मांच्याच पसंतीचे जाट जमातीचे एक आमदार बन्सीलाल ह्यांना मुख्यमंत्रीपद दिलं गेलं. शर्मांना प्रदेश काँग्रेसचं प्रमुखत्व देण्याचं, श्री. गुलझारीलाल नंदांच्या उपस्थितीत, उभयतांनी मान्य केलं. परंतु नंतर बन्सीलाल विथरले, श्रेष्ठींनी त्यांना साथ दिली व शर्मांना सर्वच सत्तास्थानांवरून डावलण्यात आले. छेडा प्रकरणाचं निमित्त असलं, तरी असंतोषाची बीजं शर्मांना पद्धतशीरपणे डावलण्यात होती. डिवचलेल्या शर्मांनी निर्वाणीचं पाऊल उचललं. ह्या प्रकरणात शर्मा काँग्रेसमधून उडवले गेले; मध्यावधी निवडणुकीपूर्वी नैतिक शुचितेचा निर्माण केलेला देखावा काँग्रेसकडूनच उघळला गेला ! तूर्त बन्सीलाल मत्रीमंडळ सावरलं गेलं आहे, पण हरियानाच्या राजकारणात पुन्हा एकदा 'आयाराम गयाराम' तंत्र सुरू होईल असं वाटतंय ! हरियाना विधानसभेच्या जातुसाना मतदारसंघाच्या

पोटनिवडणुकीत विशाल हरियाना पक्षाचे श्री. सोमराम हे काँग्रेस उमेदवार चौधरी निहालसिंग ह्यांचा, सरळ लढतीत पराभव करून निवडून आले आहेत. काँग्रेसला बसलेला हा फटका, चालू घडामोडींचाच निश्चित परिपाक आहे ! हरियाना प्रकरणाचे परिणाम पंजाब, उ. प्रदेश, बंगाल व बिहार येथील मध्यावधी निवडणुकांवर निश्चितच होतील !

पक्षांतरांचा हा तमाशा हरियानात चालू असताना, संसद सदस्य समितीने सुचविलेले उपाय फारसे भरीव नाहीत असं म्हणावसं वाटतं. पक्षांतरिताला एक वर्षभर मंत्री वा अन्य कुठलंही सरकारी अधिकारपद मिळू नये, पक्ष बदलण्याच्या परिस्थितीमुळे मुख्यमंत्र्यास विधानसभा बरखास्त करण्याचा सल्ला राज्यपालाला देणे इष्ट वाटल्यास तो देण्याचा अधिकार नसावा. मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या मर्यादित असावी वगैरे काही 'जुजबी' व त्याही निश्चित नसलेल्या, शिफारशी ह्या समितीने केलेल्या आहेत. श्री. चव्हाणांच्या अध्यक्षतेखालील ह्या समितीच्या अहवालाला, सर्वश्री मधू लिमये, मधोक, भूपेश गुप्ता, पी. राममूर्ती आदींनी भिन्न मत पत्रिका जोडल्या आहेत. बऱ्याच तपशीलाबाबत समिती सदस्यांत मतैक्य झालेलं नाही. अर्थात अशा जुजबी शिफारशींची बुज कोण कितपत राखणार हे सांगायला नकोच. नाही म्हणायला, समितीच्या शिफारशींनुसार, पक्षांतरावर परिणामकारक बंधन घालण्याच्या दृष्टीने कायदा केला जाण्याची शक्यता आहे.

परंतु हे सर्व जुजबी उपाय आहेत व त्यामुळे अनिष्ट वळण घेतलेल्या सध्याच्या राजकारणात काहीच बदल घडणार नाहीत. आमदार-खासदारावरही त्यांचा फारसा परिणाम होणार नाही; मतदारांनाच आपण निवडून दिलेल्या उमेदवाराला परत बोलावण्याचा अधिकार जोपर्यंत प्राप्त होत नाही, तोपर्यंत ह्या पक्षांतराच्या साथीला योग्य पायबंद बसणार नाही. त्यासाठी घटनेत बदल घडवून आणावा लागेल; सुजाण, सुविद्य समाजधुरिणांना लोकशाहीच्या, जनहिताच्या दृष्टीकोणातून असा आंदोलनाला हात घालावा लागेल !

## नक्षलबाडी व राष्ट्रवादी

नक्षलबाडीच्या केरळीय आवृत्तीनंतर देशभर नक्षलबाडीप्रवृत्तींच्या लोकांनी भिन्न भिन्न घोषणा लिहिल्या–" माओ जिंदाबाद ", " बंदुकीच्या नळीतून क्रांतीचा मार्ग जातो ", " निवडणुकांचा धिक्कार असो " वगैरे वगैरे. ह्या सर्व प्रकरणात व केरळातील प्रकारांमागे प्रत्यक्ष चिन्यांचा हात असावा ह्याचे पुरावे हळूहळू पुढे येत आहेत. अशा पार्श्वभूमीवर, ह्या प्रवृत्तीचा देशभर उत्स्फूर्त निषेध होणं व संरक्षण-मंत्री श्री. स्वर्णसिंग ह्यांनी लोकसभेत " चीन व पाकिस्तान अशा दोन्ही आघाड्यांवर मुकाबला करण्यास देश समर्थ आहे. " असं ठामपणं सांगणं ह्या गोष्टी

उत्साहजनक आहेत. चीन, पाकिस्तान व भारत ह्यांच्या सैनिकी सामर्थ्याविषयी निश्चित तुलनात्मक आकडे उपलब्ध नसले व चीनच्या अण्वस्त्रांच्या व पाकिस्तानला होणाऱ्या शस्त्रास्त्र मदतीच्या बातम्या वरचेवर येत असल्या तरी काही ताज्या बातम्या, आवडी, मिग वगैरे कारखान्यांतली आपली प्रगती व आमचा वाढलेला शस्त्रविश्वास, ह्यामुळं श्री. स्वर्णसिंगांच्या वक्तव्यात फोलपणा जाणवत नाही. अमेरिकी व ब्रिटिश रणधुरंधरांनी भारताच्या ह्या बाबतीतल्या प्रगतिची पावती दिलेली आहे. शिवाय बदललेल्या राजकीय परिस्थितीत, सध्यातरी चीन भारताविरुद्ध प्रत्यक्ष युद्धात स्वतःला गुंतवून घेईल ही शक्यता नाही. पाकिस्तान तर सध्या अंतर्गत कलहातच जखडलेला आहे. त्यामुळे सध्या तरी ह्या दोन्ही आघाड्यांवर प्रत्यक्ष संघर्ष पेटणार नाही हे उघड आहे. परंतु नक्षलबाडी गट, जमियते इस्लाम वगैरेंसारखे इस्लामवादी गट, ह्यांना चिथावण्या देऊन, भारतात अस्थिरता निर्माण करायची व येथील शासन खिळखिळे करायचे प्रयत्न ही दोन्ही राष्ट्रे निश्चितच करू शकतील. अशा परिस्थितीत देशातील राष्ट्रवाद्यांचा ह्या कृत्यांना होत असणारा उत्स्फूर्त विरोध आणि केंद्र सरकारचा ह्या प्रकरणात खंबीर आत्मविश्वास ह्या गोष्टी खासच स्वागतार्ह आहेत !

नक्षलबाडीवाद्यांच्या कृत्यांना जशास तसे ह्या न्यायाने मुंबईत बुधवारी माओ-त्से-तुंग ह्यांची प्रतिमा जाळण्याचा कार्यक्रम स्वतंत्र पक्षाने आखला आहे. जनसंघीयांनी प्रतिघोषणा लिहिल्या आहेत व नक्षलबाडीवाद्यांनी लिहिलेल्या घोषणा पुसून काढण्याचा उपक्रम चालवला आहे. पण नुसते पुतळे जाळून किंवा प्रतिघोषणा लिहून काम होणार नाही, हे आता लक्षात घेतलं पाहिजे. नुसताच आत्मविश्वास असूनही चालणार नाही. गरिबी, दोन समाजांतली तफावत, उपासमार वगरे ज्या असंतोषाचं भांडवल उभं करून ह्या देशद्रोही, घातपाती चळवळी फोफावतात, त्यांच्या मुळांवर घाव घालण्याचे प्रयत्न झाल्याशिवाय ह्या वरवरच्या मलमपट्ट्यांनी कार्यभाग साधणार नाही ! राष्ट्रवाद्यांनी ह्या फुटीरवाद्यांचा समाचार अवश्य घ्यावा, पण त्याचबरोबर दारिद्र्यात खितपत पडलेल्या समाजाच्या उत्कर्षाच्या भरीव योजना जर त्यांनी आखल्या नाहीत तर, ह्या समाजाला राष्ट्रीय दृष्टिकोण देण्यास ते कधीच यशस्वी होणार नाहीत; **जोपर्यंत हे होत नाही, तोपर्यंत शस्त्रसामर्थ्य किंवा मूठभर सुशिक्षितांचा राष्ट्रवाद हा ह्या फुटीर चळवळी कायमच्या उपटून टाकूच शकणार नाही !**

## झोपडीवाले सचिवालयावर चालून गेले तेव्हा !

सोमवार, दिनांक १६ डिसेंबर, १९६८ ! मुंबईतल्या झोपडी-रहिवाश्यांचा एक प्रचंड मोर्चा सचिवालयावर चालून गेला. आपल्या मागण्यांची दाद आपल्या पद्धतीने

लावून घेण्यासाठी ! मोर्चा नुसता मुख्यमंत्र्यांना मागण्या सादर करण्यासाठी गेला नव्हता; तर कबजा मिळवण्यासाठी तो सचिवालयावर चालून गेला होता ! डावे-उजवे कम्युनिस्ट, संसोपा, रिपब्लिकन पक्ष आदींनी निर्माण केलेल्या झोपडी-रहिवाशी संग्राम समितीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या, पाच हजारांच्या ह्या मोर्च्याच्या अग्रभागी एका बैलगाडीवर झोपडीच्या दारात हातात मूल घेऊन उभ्या असलेल्या बाईचं दृश्य साकार करण्यात आलं होतं. ठराविक पद्धतीने विद्यापीठ इमारतीपाशी, काळ्या घोड्याच्या आधी मोर्चा अडवण्यात आला. श्रीमती अहिल्या रांगणेकरांनी पोलिसांचं कडं तोडून आत घुसण्याचा प्रयत्न केला. नंतर दोन्ही पक्षांत हातघाई झाली, पोलिसांनी छडीमार आणि अश्रूधुराचा वापर केला, मोर्चेवाल्यांनी चपला, जोडे, दगड-विटा आदींचा वापर केला. जखमींचा आकडा अधिकृतपणे अकराचा सांगितला जातो, तो कदाचित जास्तही असेल. पोलिसांच्या अश्रुधुरानंतर जमावाची पांगापांग झाली आणि ही लढाई संपली ! आता दोन्ही बाजूंकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप होतील, पोलिसांच्या कृत्यांच्या चौकशीची मागणी होईल आणि एकंदर प्रकरणात झोपडपट्ट्यांच्या निर्मूलनाचं व झोपडपट्टी-रहिवाश्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न नेहमीप्रमाणेच मागे पडतील—कवित्व राहील ते ह्या लढतीचं, वादंग राहील ते ह्यांत कुणाची सरशी झाली त्याचे !

दोन—तीन महिन्यांपूर्वी मुंबईच्या झोपडपट्ट्यांच्या निर्मूलनाची एक योजना आखण्यात आली. महसूलमंत्री श्री. बाळासाहेब देसाई ह्यांनी पुढाकार घेतला होता. एक एक वस्ती आस्ते आस्ते उठवायची व त्यांना पर्यायी जागा पुनर्वसनासाठी द्यायची अशी ही योजना होती. पर्यायी जागा देताना काही विशिष्ट तत्त्वं अवलंबायची हे ठरलं होतं. त्यामुळं अनेक झोपडी-रहिवाशांना कदाचित् बेघर व्हावं लागलं असतं. ह्या योजनेवरून झोपडीवाल्यांमध्य असंतोष फैलावण्यासाठी डाव्या विरोधी पक्षांना एक निमित्त सापडलं आणि त्यांनी ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन झोपडपट्टी संग्राम समितीची निर्मिती केली. त्यातूनच आजचा समर प्रसंग उभा ठाकला. पर्यायी जागा दिल्याशिवाय झोपड्या पाडू नयेत, कोणाही झोपडी-रहिवाशाला ह्या नवीन योजनेमुळे मुंबईबाहेर जायची पाळी येऊ नये ह्या त्यांच्या मागण्या ! मुंबईच्या अफाट औद्योगीकरणामुळे, देशाच्या कानाकोपऱ्यांतून कुशल, बिनकुशल कामगारांच्या झुंडीच्या झुंडी मुंबईत लोटल्या. काही कामासाठी, काही काम शोधण्यासाठी! आणि ह्या अनिर्बंध झुंडींमुळेच ह्या झोपडपट्ट्या ठिकठिकाणी उभ्या राहिल्या ! झोपडपट्ट्या आपल्याबरोबर येताना सारी वैशिष्टचे घेऊन आल्या व त्यांनी मुंबईच्या सामाजिक जीवनावरच एक प्रकारे आक्रमण केलं. ह्या बाबतीत सरकारनं प्रथमपासूनच अत्यंत चालढकलीचं व निष्काळजी धोरण ठेवलं, ह्या अनिर्बंध प्रवेशांवर कसलंही नियंत्रण ठेवलं नाही. ह्या सर्वच हलगर्जी धोरणातून निर्माण झालेला झोपडपट्ट्यांचा प्रश्न आज मुंबईची डोकेदुखी होऊन बसला आहे. आज त्या उठ-

वायच्या तरी त्यांतील रहिवाशांच्या पुनर्वसनाची नैतिक जबाबदारी महाराष्ट्र सरकार व मुंबई महापालिका ह्यांची आहे. त्या दृष्टीनं त्यांनी पावलं टाकली आहेत. हे पुनर्वसन करताना, सर्वच झोपडी-रहिवाशांच्या पुनर्वसनाची व्यवस्था करणं व्यावहारिक दृष्ट्या अशक्य आहे. त्याचबरोबर झोपडपट्ट्या वाढू देणंही सर्वच दृष्टींनी चुकीचं ठरणार आहे. सरकारी दिरंगाईमुळे हा प्रश्न आज डोकेदुखी झाला आहे व त्याचा गैरफायदा विरोधी पक्षीय घेत आहेत !

वास्तविक ह्या प्रश्नावर सर्व पक्षांनी सरकारशी सहकार्य करून काही व्यवहार्य योजना सादर करणं आवश्यक आहे; कारण तसं करणंच, झोपड–रहिवाश्यांसह सर्वच समाजाच्या फायद्याचं आहे. झोपडपट्टीतला समाज दुर्लक्षित तर राहू नये, त्याला योग्य ते शिक्षण देऊन प्रगत समाजांबरोबर आणलं जावं, त्याच्या भावना पेटवून त्याला अन्य समाजांबरोबर लढायला प्रवृत्त करणं अव्यवहार्य आहे. परंतु असंतोषाचा राजकीय फायदा उठविणं एवढंच माहीत असणाऱ्या विरोधकांना–विशेषत: डाव्या विरोधकांना–एखादी विधायक योजना पुढे आली तरी ती नकोच असणार ! एरवी, अशा वेळीच फक्त झोपडी-रहिवाश्यांना पुढे करून त्यांच्या हिताचा कळवळा सांगणारे डावे नेते त्यांच्या उत्कर्षाच्या काही योजना स्वत: राबवते झाले असते ! ते होत नाही तोपर्यंत नुसत्या घोषणा, थोडे मोर्चे व नकली पुनर्वसन ह्यांनी झोपडपट्ट्यांचे प्रश्न सुटणार नाहीत !

○


**मा णू स**

साप्ताहिकाचे
विक्रीसाठी
पणजी (गोवा)
येथे
एजंट नेमणे आहे.
संपर्क साधावा.
–व्यवस्थापक



# ज्ञानबाचं गुऱ्हाळ

## मुंबईतील नवा शैव-वैष्णव-वाद

मुंबईच्या महापालिकेत परवाच एका महत्त्वाच्या विषयावर खडाजंगीची चर्चा झाली. महापालिकेच्या संमतीने अंधेरी नाक्यावर एक पुतळा बसविण्यात येणार आहे. हा पुतळा शिवाजी महाराजांचा असावा असा ठराव महापालिकेतील शिवसेना गटाच्या एका सभासदाने आणला होता. याउलट काँग्रेसच्या एका सभासदाने महात्माजींचा पुतळा या ठिकाणी उभारण्यात यावा असा ठराव आणला. अर्थात कोणता तरी एकच पुतळा एका नाक्यावर उभा करणे शक्य आहे. यामुळे 'शिवाजी का बापूजी' असा वाद उपस्थित झाला. शिवसेनेच्या सभासदांचे म्हणणे असे की, आमचा हा ठराव आधीचा आहे आणि त्याचा विचार आधी झाला पाहिजे. याउलट बापूजीपक्षाचे म्हणणे पडले की......

जाऊ द्या. वाचकहो, मुद्दा लक्षात आला ना तुमच्या ? या ठिकाणी 'शिवाजी आणि गांधीजी' ही नावे महत्त्वाची नसून 'शिवसेना का काँग्रेस' हा खरा वादाचा मुद्दा आहे. बापूजींचा पुतळा उभारला तर बिघडले काही नाही. पण तो शिवसेनेचा पराभव होईल ! शिवाजीमहाराजांचा पुतळा उभारल्यानेही काही बिघडत नाही. पण तो काँग्रेसचा–निदान मुंबई काँग्रेसचा–पराभव होईल ! आता यातून मार्ग कसा काढायचा ? मागे शैव–वैष्णव वाद फार जोरात होता. शिवभक्त विष्णूला मानीत नसत आणि विष्णुभक्त शंकराला मानीत नसत. तोच वाद पुन्हा नव्याने निर्माण झालेला दिसतो. 'शिवभक्त' आणि 'वैष्णवजन' पंथातील हा नव्या मनूतला वाद आहे. छत्रपतींचे भक्त ते शिवभक्त आणि 'वैष्णवजन तो तेणे कहिये ...' या गांधीच्या पंथातील लोक वैष्णवजन. हरिहरांचे ऐक्य या विषयावर संतांनी पूर्वी घसा कोरडा पडेपर्यंत प्रवचने दिली. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. तसाच तो या ठिकाणीही होण्याची शक्यता नाही.

या कामी राजकारणातील त्रयस्थ विद्वानांचे मत विचारावे म्हणून परवाच मी सुप्रसिद्ध विद्वान प्राध्यापक डॉक्टर बृहस्पती पीएच. डी., डी. लिट् (लंडन) यांच्याकडे गेलो होतो. डॉक्टर बृहस्पती हे तडजोडवादी म्हणून प्रसिद्ध असल्यामुळे या विषयावरची त्यांची मते नेहमीच विचारात घेण्यासारखी असतात, असे मी ऐकले

होते. कोणत्याही प्रश्नावर तौलनिक, काटेकोर, रोखठोक इ. इ. बोलण्याबद्दल त्यांची प्रसिद्धी आहे.

मुलाखतीचा उद्देश सांगितल्यावर विद्वान माणसाला शोभेल अशी उदास, सुतकी मुद्रा करून डॉक्टर बृहस्पती म्हणाले.

"होय, ही बातमी मी वाचल्याचं आठवतं. कदाचित ती मी प्रत्यक्ष वाचली नसेल. कुणीतरी मला तोंडी सांगितली असल्याचाही संभव आहे. कदाचित–"

"होय, पण त्याबद्दल आपले मत काय आहे ?"–मी मुद्याला हात घालण्याचा प्रयत्न केला.

"कदाचित नभोवाणीवरूनही ही बातमी कानावर पडली असण्याचा संभव आहे." डॉक्टरांनी आपला मुद्दा पूर्ण केला–"तेव्हापासून मी या घटनेचा बारकाईने विचार करीत आहे. त्यामागची आर्थिक, सामाजिक, ऐतिहासिक मीमांसा आपल्याला करता आली पाहिजे. ती समजावून घेतल्याशिवाय आपल्याला या मुद्याचा सर्वंकष आणि साकल्याने विचार करता येईल असं मला वाटत नाही."

"मग करा ना विचार ! इथं कोण लेकाचा नको म्हणतो आहे ?"–असे शब्द उच्चारायचे माझ्या अगदी तोंडावर आले होते. पण बृहस्पती पुढे काय म्हणतात ते ऐकावे या उद्देशाने मी थोडा वेळ गप्प राहिलो. मग म्हटले,

"आर्थिक दृष्टीनं याचा विचार म्हणजे काय ? पुतळ्याला किती पैसे लागतील हाच ना ! हात् तिच्या ! अहो पुतळा कुणाचाही असला तरी खर्च सारखाच येणार !"

"हे तुमचे उथळ विचार पाहून मला फार खेद होतो." बृहस्पती माझ्याकडे उपरोधाने पाहून बोलले. "तरुण पिढीत हल्ली काही अभ्यासच राहिलेला नाही. कुठल्याही गोष्टीचा विचार वरवर करून चालत नाही. आता ह्या पुतळ्याचा प्रश्न घ्या. आर्थिक दृष्टीनं या प्रश्नाला निराळी बाजू आहे. तिचा विचार करणं इष्ट आहे."

"म्हणजे कसं म्हणता तुम्ही ?" मी नम्रपणे खुलासा विचारला.

"पुतळा दोघांचाही असला तरी दोघांच्या देहयष्टीत फरक आहे. शिवाजीमहाराज हे घष्टपुष्ट शरीराचे. तब्बेतीनं ठणठणीत. त्यांचा पुतळा करायचा म्हणजे वेळ जास्त जाईल आणि ब्रॉंझ, लोखंड, पंचरस, काय धातू असेल तोही जास्त लागेल. याउलट गांधीजी अंगाने बारीक, थोडक्यात काम. शिल्पकाराला मोबदला दोन्हीकडे सारखाच मानला तरी धातूची उधळपट्टी सध्याच्या टंचाईच्या काळात करावी काय, इ. प्रश्नाचा आपल्याला गंभीरपणे विचार करावा लागेल. आणखी एक गोष्ट तुमच्या लक्षात आलेली दिसत नाही."

"ती कोणती ?"

"गांधींच्या पुतळ्यासाठी एकट्या गांधीजींखेरीज फक्त काठी पुरेशी आहे.

दुसरं काही लागत नाही. पण शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याचा विचार करताना नुसता त्यांचा पुतळा चालणार नाही. त्यांचा घोडाही त्यात आलाच. घोड्याशिवाय महाराज हे मराठी मनाला पटतच नाही. म्हणजे एका घोड्याचा खर्च निष्कारण वाढला की नाही ?"

या ठिकाणी 'घोडा की घोडी' असा एक प्रश्न विचारण्याचे माझ्या मनात होते. कारण छत्रपती महाराज नेहमी काळ्या घोडीवर बसत, असे मी कोठेतरी वाचले होते. पण हा प्रश्न मी मुद्दामच टाळला. कारण प्रोफेसरसाहेब अर्थशास्त्राप्रमाणेच इतिहास आणि राज्यशास्त्र यांचेही पंडित होते. एकदा का घोड्याचा विषय निघाला असता म्हणजे भलत्याच रुळावर गाडी गेली असती. इतिहासातील अनेक घोड्यांचा उद्धार झाला असता. तेव्हा असला प्रश्न विचारून आपला गाढवपणा दाखवणे बरे नव्हे असा मी पोक्त विचार केला. पुन्हा गप्प बसलो.

"हा अर्थशास्त्रीय विचार कुणी मनावरच घेत नाही–" प्रोफेसरसाहेब पुढे सांगू लागले. "आता त्यात एक गोष्ट आहे. सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीनं पाहिलं तर महाराजांचा पुतळा रुबाबदार वाटतो. तो टोप, झगा, तलवार, दाढीमिशा यांचा एकप्रकारचा परिणाम पाहणाऱ्याच्या मनावर होतो. उलट गांधींचा पुतळा त्या दृष्टीनं उपयोगी नाही. दात नसलेलं त्यांचं तोंड, छातीची हाडं, डोक्यावरील टक्कल हे सौंदर्यशास्त्राच्या विरुद्ध आहे. पाहणाराला तितकसं काही बरं वाटणार नाही. आता राज्यशास्त्राच्या दृष्टीनं गांधींचा पुतळा इष्ट. कारण तो वर्तमानकाळाकडं बोट दाखवतो. याउलट इतिहासाच्या दृष्टीनं शिवाजीमहाराजांचा पुतळा योग्य. पण त्यामुळं भूतकाळाकडं दृष्टी जाते......"

माझे डोके गरगरू लागले. कसेबसे मी विचारले, "पण राजनीती अन् इतिहास यांचा इथं संबंध काय ? दोन्हींत फरक आहे."

"तसा फरक दोन्हीत म्हटला तर आहे, म्हटला तर अजिबात नाही ! इतिहास म्हणजे भूतकाळातील राजकारण आणि राजकारण म्हणजे वर्तमानकाळातील इतिहास. मूलभूत फरक काही नाही. शिवाजीमहाराज हे भूतकाळातले महापुरुष तर गांधीजी हे वर्तमानकाळातले महापुरुष."

"म्हणजे दोघांत फरक काही नाही असंच तुम्हांला म्हणायचं आहे ना ?" कंटाळून मी विचारले.

"इक्झॅक्टली ! आता तुम्हांला माझा एक पॉइंट समजला." बृहस्पतींच्या मुद्रेवर समाधान झळकले.

"पण त्याचा हा वाद मिटविण्याच्या दृष्टीनं उपयोग काय ?"

"अध्यात्माच्या दृष्टीनं आम्ही दोन महापुरुषांत काही फरक मानीत नाहीत. दोघंही एकाच परब्रह्माचे अंश. एकच चिद्विलास."

आता बहुतेक आपली समाधी लागणार अशी मला भीती वाटू लागली. न

जाणो हा विद्वान आपली कुंडलिनी वगैरे जागृत करतो की काय, अशीही धास्ती पडली. पण तेवढ्यात बृहस्पतीच स्वत: शेवटच्या मुद्याकडे वळले. चेहरा पूर्णपणे गंभीर, निर्विकार करून ते म्हणाले,

"......तरी पण सामान्य जनांच्या सोयीसाठी काही तरी सगुण, साकार विचार केलाच पाहिज. या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मी एकच उपाय सुचवीन–"

"कोणता, कोणता ?" मी उत्सुकतेने विचारले.

अंधेरी भागात एकच नाका असेल असं नाही. दोन चौक तरी नक्की असतील. त्या दोन्ही चौकांत दोन पुतळे बसवून दोघांचंही समाधान करायचं."

"म्हणजे ही कृषी विद्यापीठ पद्धतीनं या प्रश्नाची सोडवणूक झाली ! हात्तिच्या ! मग त्यात काय विशेष आहे ?"

"अन् एकच पुतळा उभारायचा असेल तर दुसरा एक उपाय आहे. दोघांनाही थोडंथोडं समाधान होईल असा–"

"बोला–"

"हातात तलवार घेऊन महात्मा गांधी हे काळ्या घोड्यावर बसले आहेत असा तरी पुतळा करावा किंवा–शिवाजीमहाराज चरखा घेऊन सूत काढीत बसलेले आहेत असा तरी पुतळा उभारावा. म्हणजे दोघांचेही समाधान होईल."

प्रोफेसरसाहेबांचा हा विद्वत्ताप्रचुर तोडगा ऐकल्यावर माझे ताबडतोब समाधान झाले आणि त्या क्षणीच मी त्यांना नमस्कार ठोकून बाहेर धाव घेतली.

असल्या प्रकरणात विद्वान लोकांचे मत विचारायला शहाण्या माणसाने कधीही जाऊ नये, हा धडा तेव्हापासून घेतला !

## चुंबनकलेवर अनुबोधपट

आय्. एस्. जोहर हे विनोदी नट, दिग्दर्शक आपल्याला ठाऊकच आहेत. सध्या ते काय करताहेत माहीत आहे ? चुंबन-कलेचा ऐतिहासिक, सामाजिक असा जागतिक आढावा घेणारा अनुबोधपट (डाक्युमेंटरी) तयार करीत आहेत. 'चुंबनाची कला' हा आपल्या अनुबोधपटाचा विषय आहे असे जे सांगण्यात आले ते चुकीचे आहे असे ते पत्रकारांच्या बठकीत म्हणाले. ते पुढे म्हणाले, "न्यूयॉर्कमधील 'फिलम मॅरेज म्युझियम' या संस्थेने माझ्या या अनुबोधपटाचे वितरणाचे अधिकार मागितले आहेत. यावरूनच या अनुबोधपटाचे शैक्षणिक आणि ऐतिहासिक महत्त्व सिद्ध होते......चुंबन हे अमेरिकन रीतीभातीतील एक महत्त्वाचे अंग आहे. हा संस्कार तिथं फार प्रबळ आहे. इतका की, 'भीक नको, पण कुत्रा आवर' या पद्धतीवर 'हट्ट नको, पण चुंबन आवर' असे तेथील मुलेसुद्धा मानतात..."

जोहर हे जे काही बोलले ते मला सगळे काही समजले नाही. पण चुंबनकलेसंबंधी काहीतरी भरीव कार्य करण्याचा त्यांचा इरादा आहे हे खास. त्याबद्दल

त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. लहान मुलांचे चुंबन मोठी माणसे घेतात तेव्हा त्याला पापा म्हणतात. पण मोठी माणसे (काही कारण नसताना) दुसऱ्या मोठ्या माणसाचा जो पापा घेतात त्याला चुंबन म्हणतात. निदान मराठीत तरी हाच अर्थ रूढ आहे. त्यामुळे या अनुबोधपटात पुष्कळच चांगली चुंबने पाहायला मिळतील, अशी आशा करू या. अनायासे हा अनुबोधपट तयार होतोच आहे तर आपल्याही काही सूचना कराव्यात असे मला वाटले. म्हणून जोहरसाहेबांना मी पुढील जाहीर सूचना करीत आहे. त्याचा त्यांनी अवश्य विचार करावा.

१. ज्या अर्थी या अनुबोधपटाला शैक्षणिक महत्त्व आहे असे जोहर यांना वाटते त्या अर्थी चुंबन हे शास्त्रोक्त पद्धतीने कसे घ्यावे आणि द्यावे याची मीमांसा आणि निवडक प्रात्यक्षिके त्यात असावीत. या प्रात्यक्षिकांत भाग घेणारे नटनटी सुंदर असावेत. म्हणजे तो देखावा सुसह्य होईल.

२. चुंबन घेताना प्रियकर किंवा प्रेयसी यांपैकी एखाद्याचे नाक वाजवीपेक्षा जास्त लांब असल्यास किंवा प्रियकराच्या मिशा भरघोस असल्यास त्यात थोडा विक्षेप येतो. (निदान असे इंग्रजी चित्रपट पाहताना तसे मत होते.) या अडचणींचे निराकरण शास्त्रीय पद्धतीने कसे करावे ?

३. लिपस्टिक लावण्याच्या फॅशनमुळे प्रियकराचे ओठ किंवा गाल काही कारण नसताना लाल होतात. त्यापासून बचाव कोणत्या प्रकारे करावा ? प्रियकरानेच आधी ओठ रंगवून मग प्रेयसीचे चुंबन घेतल्यास लिपस्टिक अधिक चांगली लागेल काय ?

४. बायकोचे चुंबन आणि प्रेयसीचे चुंबन यांत काही फरक असतो काय ? 'चोरटे चुंबन' म्हणून वाङ्मयात ज्याची वर्णने येतात ते हेच काय ? असल्यास दोहोंतील फरक स्पष्ट व्हावा.

५. चुंबन घेताना श्वसनक्रियेशी फार जवळचा संबंध येतो. 'दमसांस' बरोबर असल्याशिवाय भरघोस चुंबन घेता येत नाही असे अनुभवी लोक सांगतात. त्या दृष्टीने चुंबन आणि प्राणायाम यांची सांगड घालणे शक्य आहे काय ? चुंबनाचा योगमार्गाशी संबंध जोडून दिल्यास आपल्या देशातही चुंबनसंस्था रूढ होण्यास फारच सोपे जाईल.

६. चुंबन घेताना आवाज करणे हे कितपत सुसंस्कृतपणाचे आहे ? प्रात्यक्षिकांनी खुलासा व्हावा.

या काही सहज सूचना बातमी वाचल्याबरोबर मनात आल्या. जोहरसाहेब यावर विचार करतील काय ?

हा चित्रपट पाहताना थिएटरमध्येही कोणी प्रेमाने आपल्या बायकोचे चुंबन घेतल्यास त्यास परवानगी असावी आणि शाळा-कॉलेजांतल्या पोरांना कन्सेशन रेटने हा अनुबोधपट पाहण्याची सवलत देण्यात यावी. एवढीच सरकारलाही या निमित्ताने सूचना करावीशी वाटते. O

अवघ्या तेरा वर्षात हिटलरचे तिसरे राईश रसातळाला गेले. कधीही जिंकली नव्हती एवढी भूमी राईशने या काळात जिंकली. आणि हे घडते न घडते तोच हे तिसरे राईश एकाएकी संपूर्णपणे असे उन्मळून पडले की, जगाच्या इतिहासात असा जय, असा पराजय कुणा राष्ट्राने कधी अनुभवला नव्हता. पुढेही अनुभवणार नाही.

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : रुपये पंचवीस

गंधर्व रंगमंदिर निमंत्रित प्रेक्षकांनी फुलून गेलेले.

कार्यक्रमाची नियोजित वेळ टळून गेल्याने थोडीशी चुळबुळ सुरू झाली असतानाच 'आले आले चा टकारा' आणि त्या पाठोपाठ कडक इस्त्रीची पाचपन्नास खादी मंडळी सुस्त चालीने येऊन अलगद स्थानापन्न झाली. त्यांच्यावरून नजर फिरवत असतानाच टाळ्यांचा कडकडाट झाल्याने अभावितपणे रंगमंचावर नजर गेली. भारतीय पद्धतीच्या बैठकीवर भारताचे उपमहामंत्री श्री. मोरारजीभाई देसाई, त्यांच्या सोबत अपेक्षित असणाऱ्या सर्व लवाजम्यासह हजर होते. 'राजविलासी केवडा' या लोकसाहित्य समितीच्या नवीन पुस्तकाच्या प्रकाशन-समारंभाची ही नांदी होती.

पुस्तक प्रकाशन समारंभ म्हटल्यावर कौतुकाचा जो

# संचालिका आणि संपादिका

शरद गोखले

भाग असतो त्याच्या जोडीला शासनाची शक्ती समर्थपणे उभी असल्याचे या समारंभप्रसंगी वाटण्यात आलेल्या छोट्या पुस्तिकेच्या सजावटसंपन्नतेवरून सहज लक्षात येते.

कौतुकाची चार–दोन भाषणे झाली. लोकसाहित्य संकलित, संपादित करण्याची गरज व त्या मागील हेतू आदी बाबींचा वक्त्यांनी ऊहापोह केला. नामदार मोरारजीभाईंनी उपक्रमाचे कौतुक करून पुस्तक प्रकाशित झाल्याचे घोषित केले. समारंभाच्या प्रमुख संयोजक डॉ. सरोजिनीताई बाबर यांनी समितीच्या कार्याला वाढता पाठिंबा मिळत असल्याचे सांगितले. राष्ट्रगीताने समारंभाची सांगता झाली. उत्सुकतेने आत आलेली मंडळी कर्तव्यपूर्तीच्या भावनेने बाहेर पडली.

पुस्तकाची प्रत पाहिल्यावर मनात अनेक विचार आले. इतक्या सुंदर छपाईचे, आकर्षक सजावटीचे भले दांडगे पुस्तक केवळ साडेसात रुपयांत देणे परवडते



## डॉ. सरोजिनी बाबर

कसे? 'लोकसाहित्य समिती' हा काय प्रकार आहे? नाव अधून मधून कानांवरून जात असले तरी काम कशा स्वरूपाचे आहे याची माहिती घेण्याची उत्सुकता वाटू लागली. दुपारची विश्रांती झाल्यावर समितीच्या अध्यक्ष सरोजिनीताईंशी फोनवर बातचीत करून भेटण्याची वेळ निश्चित केली.

ठरल्याप्रमाणे ताईंकडे गेलो, काहीसा उशीर झाल्याने थोडीशी नाराजी झाल्याचे लक्षात आले, तिकडे दुर्लक्ष करून कामास सुरुवात केली. सरोजिनीताईंच्या भगिनी आणि वडील आवश्यक ते सहकार्य देण्यास तयार होतेच.

महाराष्ट्राच्या खेडोपाडी राहणाऱ्या गोरगरीब स्त्रियांजवळ मौलिक वाटावे अशा तऱ्हेचे लोकसाहित्य आहे. खेड्याचीच बाब कशाला, अगदी शहरी आजीबाईंजवळही सांगण्यासारखे किती तरी आहे. ओव्या, कवने, लोककथा अशा विविध स्वरूपांत दडून बसलेले हे लोकसाहित्य आजवर कोणी नोंदले नाही अथवा छापून प्रसिद्ध करण्याची फारशी तसदीही घेतली नाही. तथापि आईकडून लेकीला, सासूकडून सुनेला आणि आजोबांकडून नातवाला अशा अलिखित पद्धतीने हे लोकवाङ्मय जोपासले गेले. आज काळ बदलला. आई–लेकीची गाठ दुर्मिळ झाली. खेडोपाडीचे वातावरणही ढवळून निघाले. आणि भीती वाटू लागली की चालत

(पृष्ठ ६२ वर)

# मागास गव्हाच्या सुधारलेल्या जाती

डिसेंबरच्या मध्यापासून जानेवारीच्या मध्यापर्यंत लागवड करता येईल अशा गव्हाच्या सुधारलेल्या जाती शोधून काढण्यात भारतीय शेतीशास्त्रज्ञांनी यश मिळवले आहे. सोनोरा ६४, शरबती सोनोरा, सोनालिका व सेफेद लेर्मा (बुटक्या जाती) व एन्. पी. ८३० (उंच जात) अशी या सुधारलेल्या जातींची नावे आहेत.

सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये पावसाने दगा दिला तर गहू पिकविणाऱ्या शेतकऱ्याची पंचाईत होत असे. बागाईतीची सोय असली तरी दवाच्या अनिष्ट परिणामामुळे सध्याच्या गव्हाच्या जाती म्हणाव्या तेवढ्या जोमदार येऊ शकत नाहीत. सुधारलेल्या जाती उपलब्ध झाल्यामुळे ही गैरसोय दूर झाली आहे.

या जातीची लागवड केल्यानंतर एप्रिलच्या सुमारास हेक्टरला ३ ते ४.५ टन गव्हाचे पीक येऊ शकते. सध्याच्या जातीपेक्षा या जाती अधिक उत्पादनक्षम आहेत. दर हेक्टरला दर दिवसाला या परिमाणात उत्पादनशक्ती मोजल्यास हे सिद्ध होते. या नव्या जातींची वैशिष्ट्ये शास्त्रज्ञांनी पुढीलप्रमाणे वर्णन केली आहेत :

(१) दिवसाच्या कडक उन्हाचा या पिकावर परिणाम होत नाही. (२) प्रत्येक कणसात सध्यापेक्षा जास्त दाणे भरतात. (३) या पिकांमुळे वर्षामध्ये घ्यावयाच्या पिकांचे स्वरूप (क्रॉप रोटेशन) पूर्णपणे बदलू शकेल. (४) सध्याच्या जातीमध्ये ताटांची वाढ कमीअधिक प्रमाणांत होत असल्याने उशिरा वाढ झालेल्या ताटांची कापणीच्या वेळी पूर्ण वाढ होऊ शकत नसे. नव्या जातीची ताटे एकाच प्रमाणात वाढत असल्याने ही अडचण दूर झाली आहे. (५) उशिरा लागवड केलेल्या पिकांवर राब पडण्याचा धोका असतो. सुधारलेल्या जाती राब पाडण्याच्या धोक्यापासून मुक्त आहेत. (६) मार्च-एप्रिलमध्ये या पिकांना पाणी दिले तरी चालते.

डिसेंबर मध्य ते जानेवारी मध्य या दरम्यान लागवड करण्यामध्ये दोन धोके असतात. दव पडल्यामुळे जमिनीचे तपमान कमी होते व बियाणे अंकुरण्यास त्रास होतो. आणि त्यामुळे रोपे नीट व जोमांत वाढू शकत नाहीत. त्याचप्रमाणे मुळांची वाढ संथपणे झाल्याने जमिनीतील कस ती पूर्णपणे शोषून घेऊ शकत नाहीत. सूर्यप्रकाशाची वेळ कमी असल्याने फोटो-सिंथेसिसच्या मार्गाने निर्माण होणाऱ्या प्रक्रियेत घट होते.

या अडचणी दूर करण्यासाठी शास्त्रज्ञांनी असे सुचविले आहे की, पूर्णपणे कुजलेले शेणखत पेरा झाल्यानंतर शेतात पसरून ठेवावे. या उपायामुळे जमीन जास्त उष्णता धारण करू शकते व पीक जोमदार येते. बारीक उंचवट्यावर (ridges) लागवड करून व त्यांची दिशा सूर्यप्रकाशास सामोरी ठेवून पिकांस अधिक सूर्यप्रकाश देता येतो. मागास गहू पेरण्यातील दुसरी अडचण म्हणजे या पिकाच्या वाढीस थोडा अवधी मिळतो. यावर उपाय म्हणून असे सुचविण्यात आले आहे की, बियाणाचे प्रमाण जास्त धरावे. म्हणजे जास्त ताटे धरतील. सुयोग्य असे खताचे व पाण्याचे प्रमाण साधूनदेखील पिकाची वाढ जलद करता येते. यासाठी गव्हाच्या लागवडीपूर्वी जे पीक शेतात असेल त्या पिकास कापणीपूर्वी एक आठवडा पाणी द्यावे.

ऊस, बटाटा व मस्टर्ड यांचा हंगाम झाल्यावर, पाणीपुरवठ्याचा फायदा घेऊन मागास गहू काढण्यास आता या सुधारलेल्या जातींचा उपयोग होईल. काही ठिकाणी जानेवारीपर्यंत उसाचे पीक शेतात उभे असते. अशा ठिकाणी तीन आठवडेपर्यंत या सुधारलेल्या जातींची रोपे नर्सरीत वाढवावी व जमीन मोकळी झाल्यावर त्यांची पेरणी करावी. अर्थातच या पद्धतीस जास्त खर्च येईल. गहू व ऊस एकाच जमिनीत घेतल्याने जमिनीचा कस दोन्ही पिकांस उपकारक राहतो. उसाच्या उभ्या पिकातही या गव्हाची लागवड करता येईल अशी पद्धत शोधून काढण्यात शास्त्रज्ञांना यश मिळाले आहे.

गव्हाच्या या सुधारलेल्या जाती उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाना, दिल्ली, राजस्थान व जम्मू या प्रदेशांत उपयुक्त ठरतील. या प्रदेशांतील गव्हाखालील क्षेत्र कमी झाल्याने या नव्या जाती गव्हाचे उत्पादन वाढविण्यास अधिक उपयुक्त ठरतील.

सुधारलेल्या बियाणांनी भारतीय शेतीत क्रांती घडून येत आहे. विशेषत: कमी क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांचीही उत्पादनक्षमता वाढण्याचा संभव निर्माण झाला असून, त्यामुळे त्यांना शेतीसाठी अधिक भांडवल मिळू लागले आहे. या नव्या जातींना शेतकऱ्यांचा प्रतिसादही प्रचंड मिळत आहे. एकट्या पंजाब राज्यात मेक्सिकन गव्हाखालील क्षेत्र १९६६–६७ साली केवळ सव्वा लाख एकर होते ते १९६७–६८ साली १६ लाख एकरांवर गेले आहे. संकरित मक्याखालील क्षेत्र याच काळात ४५ हजार एकरांवरून १ लाख ५० हजार एकरांवर गेले आहे. १९६७–६८ मध्ये पंजाब सरकारने साडेपाच लाख टनांचे खताचे वाटप केले. मागील वर्षी हे वाटप केवळ दीड लाख टन होते.

यावरून शेतीसुधारणा हा केवळ चर्चेचा विषय राहिला नसून प्रत्यक्षात येऊ घातलेला एक प्रयोग झाला आहे, याची खात्री पटते.

—चंद्रशेखर मराठे.

शेवटी बापू हे 'बापू' होते म्हणून उषाची 'उषाकिरण' झाली हे मला विसरून चालणार नाही ........

# शुभं करोति

एकच आयुष्य, त्याच्या एका टोकाशी बापू, दुसऱ्या टोकाशी मनोहर. अर्धा भाग भीतीच्या अखंड छायेत पैशासाठी कलेची वेठ मारण्यात सरला, उरलेला अर्धा भाग पैसा ही बिन-महत्त्वाची गोष्ट मानून आयुष्यातल्या सुंदर गोष्टी समजावून घेण्यात चालला आहे ! कधी कधी वाटते की कुठले तरी एक नक्कीच स्वप्न असले पाहिजे ! बापू किंवा मनोहर !

लग्न मोडण्यासाठी प्रयत्न होऊनही मनोहर स्वस्थ, शांत आणि आपल्या निर्णयाला चिकटून राहिले, आपले राहिले.

आता शूटिंगव्यतिरिक्त आपल्या हक्काच्या गाड्या आपल्याला वापरण्यासाठी मिळेनाशा झाल्या.

घरात कोणी आपल्याशी मोकळे बोलेनासे झाले. आपण घरात शिरलो की, सारे स्मशानवत होऊन जाई.

आपल्या लग्नाची जणू पूर्वतयारी म्हणून घरावर अवकळा पसरली.

देवक ठेवण्याला बापूंनी नकार दिला. नोंदणी विधीला ते हजर होते. पण बोलले नाहीत.

दाराशी जिच्या मिळकतीच्या दोन गाड्या तिष्ठत असायच्या, ती एका साडी-निशी, लग्नासाठी माहेर सोडून निघाली. तिच्या श्रमांनी घरात आलेली संपत्ती घरातच राहिली. ते सारे यानंतर बापूंचे होते. उषा सोडून तिचे सारे काही त्यांनी एका हक्काने स्वतःचे मानले होते.

लग्नानंतर पहिले बिऱ्हाड झाले ते दीरांच्या जुहूच्या घरी. तिथे सात-एक महिने राहिल्यावर वांद्र्याला एक ब्लॉक मिळाला. या ब्लॉकमध्ये जुहूचे दीर आणि त्यांचे कुटुंब सोडून मनोहरांची माणसे येऊन राहिली. आपल्या माहेरचे वळण वेगळे होते, इथले वेगळे होते. प्रत्येकाचा स्वभाव नवीन होता. एकमेकांतली नाती तीच असली तरी संबंध निराळ्या प्रकारचे होते. माहेरी बापू सर्वसत्ताधिकारी आणि घरावर धाक ठेवणारे होते. इथे मामंजी घरात असले तर ते आहेत की नाही हेसुद्धा कुणाला कळत नसे. मुद्रेने ते उगीच रुक्ष आणि तुसडे वाटत. सासूबाईंकडे घराची सूत्रे होती. माहेरी आपण मिळवत्या असल्याने नाही म्हटले तरी आपले हवे-नको कोणी पाही. इथे ज्याने त्याने स्वावलंबी असावे असा कटाक्ष होता. कोणी कोणाचे उगीच कौतुक करण्याची रीत नव्हती. घर नवीन, माणसे नवीन, प्रश्नही नवनवीन उद्भवू लागले. कुणाकुणाशी कसेकसे वागायचे हेच कळेना. प्रत्येकाचे काही निराळेच. आपले आपल्यालाच या बिनसवयीच्या वातावरणात समरस होता येईना. आपण मिळवत्या पण आपल्याला इथे महत्त्व नाही अशी समजूत अकारण आपले मन ग्रासू लागली. रुपेरी सृष्टीतली आपली प्रसिद्धी आपल्याच डोक्यापर्यंत चढली होती. वाटे की, आपण एवढ्या ख्यातनाम पण या कुणाला आपले कौतुकच नाही. बरे, मनोहरनी यात कुठेतरी आपल्याला सावरावे, आवरावे, धीर दिलासा द्यावा—पण या नवख्या वातावरणात, नवख्या माणसांत आपल्याला आणून सोडून ते जणू नामा-निराळे झाले होते, आपली बाजू ते चुकूनही घेत नसत, आपल्या मनःस्थितीची विचार-पूस सहसा करीत नसत. काही म्हटले तर कानाबाहेर टाकीत. एकेकदा राग-राग येई. एकटे वाटे, असहाय्य वाटे. वाटे की, हा माणूस आहे तरी कसला ?

मग आपोआप समजू लागले की, रागवून काही उपयोग नाही. मनोहरांचे स्मितमुख पाहिले की, सगळे अवसान गळून पडे. आपल्या अपेक्षेप्रमाणे वागणारा हा माणूस नव्हे, हा वेगळाच आहे हेही उमजू लागले. आपोआप या नव्या घरात कुठेतरी आपण मनाने स्थिरावू लागलो. स्वभाव, वळणे आपली आपल्याला कळून येऊ लागली. प्रश्नांना उत्तरे—आपल्यापुरतीच—पण गवसू लागली. सवयीने सर्व आपोआप सोपे होऊ लागले. प्रथम मनाशी बांधलेले आडाखे चुकले आहेत याची

---

विजय तेंडुलकर । । । । लेखांक । नऊ

---

साक्ष पदोपदी मिळू लागली. सासू-सासऱ्यांनी आपण होऊन घरातल्या व्यवहारातून आपल्याला मोकळीक दिली आणि निर्वेधपणे चित्रपटांत कामे करण्याला प्रोत्साहन दिले. घराची जिम्मेदारी सासूबाईंनी स्वतःच्या शिरी घेतली. परिस्थितीमुळे नटीचा पेशा पुढे चालवणे आपल्याला भाग होते म्हणून दिलेली ही जुलुमाची अनुमती नव्हती. आपल्या लौकिकाचे, गुणांचे योग्य ते कौतुकदेखील त्यात होते. आणि फार मोठा विश्वास होता. आपण याने मनोमन सुखावलो. मनातल्या शंका, समजुती, धास्त्या एकेक करीत निमाल्या आणि नव्या उत्साहाने, निर्वेधपणे आपण चित्रपटांतल्या जबाबदाऱ्या पार पाडू लागलो. घर प्रामुख्याने आपल्या मिळकतीवर चालत होते पण घरातल्या वातावरणात याची कडवट वा लाचार जाणीव आपल्याला चुकूनही मिळत नव्हती. घर सर्वांचे होते. सर्वांचा त्या घरावर सारखाच हक्क होता. आपलाही होता. आपल्याला हे परिपूर्ण नि सामायिक कुटुंब-जीवन नवे होते. व्यवहाराचा अवास्तव बडीवार न ठेवणारे येथले संस्कारसंपन्न समाधानी, शांत वातावरण नवे आणि ओढ लावणारे होते. पाहता पाहता त्या घरात आपण प्राणाने गुंतलो —

त्या या घटकेपर्यंत.

उषा भान येऊन समोर पाहते. म्हणते, हा आमचा 'शुभंकरोति' बंगला १९५८ सालचा. हा आता दिसतो असाच मुळात एक उतार होता. आसपासच्या बंगल्यांच्या प्लॉट्सना भर टाकून मग बंगले बांधले. आमच्या आर्किटेक्टनी हा उतार आहे असाच उपयोगात आणायचा ठरवला; आणि हा बंगला त्या दृष्टीने बांधला. मागे बाग पाहिलीत ना कशी दाट आणि छान केली आहे ? ते बांबूचे झाड मूळचेच होते. ते पाडायचे नाही असेच आर्किटेक्टनी बंगल्याचा प्लॅन करताना ठरवले होते. ते कायम राखून बंगला बांधला. नवख्या माणसांना वाटते याला प्रायव्हसी कमी आहे; पण खुली हवा नि प्रकाश यांची सोय करून पुन्हा हा आतून सवयीने अगदी सुरक्षित वाटावा अशी याची बांधणी केली आहे. कसलीही भीती नाही. नवे येतात त्यांना जिने आणि वरखाली केलेली बेडरूम्स, स्टडीरूम्स, सिटिंग रूम, किचन, यांची रचनाही भानगडीची नि जिकिरीची वाटते. पण सवय झाली की हीच छान वाटते.

आम्हांला इथली इतकी सवय झाली आहे की एखाद्या फ्लॅट नाहीतर ब्लॉकमध्ये कोंडल्यासारखे होऊन जाते. कधी एकदा घरी येतो असे होते. डायनींग रूममध्ये एका वेळी शंभर दीडशे पान उठेल अशी सोय केली आहे. टेबलखुर्चींचे जेवण सोयीचे असते पण ताटपाटाचेच किती झाले तरी प्रशस्त वाटते........ सर्व्हंटसच्या खोलीला परस्पर बाहेरून प्रवेश आहे आणि बंगल्याशी संबंध ठेवला तर आहे, न ठेवला तर नाही. ही पाहा—या झरोक्यात भांडी ठेवली की नोकरांना बाहेरच्या बाहेर ती घासण्याकरता मिळतात. पुन्हा घासून इथे ठेवली की आत घेता येतात........

स्वतःच्याही नकळत उषा बंगलाभर फिरू लागलेली असते. मागून येणाऱ्या माणसाला सारी बारीकसारीक माहिती तन्मयतेने देत असते. शब्दाशब्दांत त्या घराविषयीची आतमीयता तुडुंब भरलेली असते.

इथं या परसदारी संध्याकाळचें नाही तर चांदण्या रात्री आम्ही मजेत खुर्च्या टाकून गप्पा करतो, कधी चहा घेतो, कधी जेवतो... चांदणीभोजन....

मागचा माणूस याने किंचित् भारावतो पण तो पुष्कळ ऐकून, विचारून आता जरासा कंटाळलेला असतो. शिवाय त्याला अजून काही विचारायचे असते. पुन्हा दिवाणखान्यात येऊन बसताच तो विचारतो,

अखेरचा चित्रपट तुम्ही कोणता आणि किती साली केलात ?

—पुरा केलेला चित्रपट गहरा दाग–गरिबाघरची लेक. तो १९६३ साली पडद्यावर आला असे आठवते. पण खरे सांगू का ? माझा अखेरचा चित्रपट मी मुळी अद्याप केलेलाच नाही. चित्रपटात भूमिका करण्याची माझी ओढ आज ओसरलेली नाही, उलट ती वाढली आहे. माझ्या आजच्या वयाला, बांध्याला साजेशा एखाद्या खूप ताकदीच्या भूमिकेची मी वाट पाहते आहे. तशी भूमिका आली तर ती मी जिद्दीने

परकरीन आणि जीव ओतून यशस्वी करीन. मागल्या माझ्या भूमिका पाहिल्या की आज माझ्या तेव्हाच्या अभिनयाबद्दल मला वाटते ते असमाधान मला एकदा कृतीने दूर करायचे आहे. मला आज पटेल अशी भूमिका मला करून दाखवायची आहे. उत्तम अभिनय म्हणजे काय असते ते आज मला कळले आहे असे मला वाटते. पण भूमिका चालून येतात त्या ठरीव ठशाच्या, ढोवळ. माझ्या जागी कुणीही मध्यमवयस्कर बाई चालेल, अशा. केवळ उषाकिरण हे नाव राहावे म्हणून मला असल्या भूमिका करायच्या नाहीत. त्यापेक्षा उषाकिरण विस्मृतीत जमा झालेली बरी. पैसा ही तर आज माझी गरज नाहीच. मला सारे पुरेसे मिळाले आहे, मिळते आहे. माझी गरज आहे ती माझ्यातली क.ला दाखविण्याची. काहीतरी माझ्या जातीचे पण आव्हान वाटावे असे अवघड साकार करण्याची. परदेशी चित्रपटांत अशा किती तरी भूमिका ज्येष्ठ अभिनेत्रींना मिळतात. यौवनात लोकप्रियतेच्या शिखरावर असताना जे करण्याची संधी लाभली नाही आणि तेवढा वकूबही नव्हता, ते त्या उतारवयात जिद्दीने करून दाखवतात आणि वहाव्वा मिळवतात. मी तर अद्याप उमेदीत आहे. माझ्या मराठी 'दूधभात' चित्रपटाची हिंदी आवृत्ती 'तन्हाई' पुष्कळ वर्षांमागे निघत होती. मध्यंतरी ती अर्धवट राहून बंद पडली. आता पुन्हा तिचे काम राम गबाल्यांनी पुढे सुरू केले आहे. माझ्या आजच्या वयाशी गोष्ट जमवून घेतली आहे. पडद्यावर हे चित्र पाहाल तेव्हा जुनी मी नि नवी मी यांतला फरक तुम्हांला कळून येईल. नवी उषाकिरण यौवनात नाही पण अभिनयाची फार मोठी जाण आता तिला आहे. माझी मीच अलिप्तपणे 'रशेस' बघते तेव्हा ही तफावत मलाच कळते आहे. छे छे, माझा अखेरचा चित्रपट अजून निर्माण व्हायचाच आहे; आणि तो माझा सर्वश्रेष्ठ चित्रपटही ठरेल असे माझे मन मला सांगते आहे. माझ्या आयुष्यात या माझ्या मनानेच माझी अहर्निश सोबत केली, सांत्वन केले, धीर दिला, मार्गदर्शन केले आणि इषारेही दिले. चुकले ती मी, ते नेहमी बरोबर ठरत आले. म्हणून माझ्या मनाच्या समजुतीवर माझा फार मोठा विश्वास आहे. माझा अखेरचा चित्रपट विचारण्याची गरजच निर्माण होणार नाही. तो आपोआप, एका हक्काने माझ्या प्रेक्षकांच्या काळजात कायमचा घर करून राहील.

**अनवधानाने का होईना, तुमच्या भावना त्या प्रश्नाने दुखावल्या याबद्दल माफ करा.**

—त्याची जरूर नाही. अस्तंगत चित्रतारका म्हणून पाहिले जाण्याची, बोलले जाते त्याची आणि न बोलता केवळ अनुल्लेखिले जाते त्याचीही मला आता चांगली सवय झाली आहे बवा. मी मात्र ते कधीच खरे मानलेले नाही.

**तुम्ही सुखी आहात ? हा जरा व्यक्तिगत प्रश्न झाला...पण—**

—या क्षणी आहे. एखाद्या क्षणी नसते. पण तरी एकंदरीने फार सुखी आहे.

असमाधान हा माझा स्वभाव आहे ते सोडा. हा स्वभाव फार काळ संतुष्ट राहूच देत नाही. लगेच डिवचून उठवतो. माझ्या आवडीनिवडी तीव्र आहेत. रागलोभ अनावर आहेत. मी काहीही विसरूच शकत नाही हाही मला दुःखी करणारा माझा एक स्वभावविशेष ठरला आहे. विशेषतः दुःखे, अपमान माझ्या स्मृतीत कायम राहून जातात. पण हा झाला भूतकाळ. वर्तमानकाळात सारे चांगले चालले आहे. सगळ्या भूतकाळावर रामबाण असा वर्तमान माझ्या वाट्याला सुदैवाने आला आहे. रात्री, पहाटे, दिवसा केव्हातरी जागेपणीच एकदम जागी होते तेव्हा वाटते की मी भाग्यवान आहे. मी संसारात आहे. एका छान माणसाची सखी आहे. आणि पोटासाठी मला कुणाच्या तोंडाकडे पाहण्याची, नवे अपमान गिळण्याची मुळीच गरज नाही. माझा नवरा माझे संरक्षण करण्याला आणि मला स्वास्थ्य देण्याला समर्थ आहे. सुख-सुख ते आणखी वेगळे काही असले तर मला ते ठाऊक नाही. पोटापलीकडे, उद्याचा घोर न बाळगता एखाद्या माणसाला आपल्या प्रतिष्ठेने आजचा विचार करता आला, तर तेच सुख असे मला वाटते. माझ्या आयुष्यापुरती ही व्याख्या खरी असेल. माझ्या व्याख्येने मी कधीमधीच्या हुरहुरीत आणि असमाधानातही फार सुखी आहे.

बापूंचे–तुमच्या वडिलांचे–पुष्कळच संदर्भ आपल्या बोलण्यात आले. त्यांना तुमच्याशी पुन्हा जमवून घ्यावे असे आजतागायत वाटलेच नाही का ? अद्याप त्यांचा तुमच्यावरचा राग कायम आहे ?

—मघा मी फोन घेतला ना; तो बापूंचाच होता.

त्यावर तर तुम्ही चांगल्या बोललात !

—हो, तेही चांगले बोलले. अधून मधून फोन करून बोलतात. कधी निमित्ताने फोन करतात, कधी निमित्ताने माझे जाणे येणे तिकडे होते. माझ्या बहिणींची लग्ने मीच करून दिली. खरे सांगायचे तर आरंभी एकेक कडवट स्मृतींना माझा जरासा विरोध असे; पण मनोहर प्रेमळ सक्ती करीत. आता माझा विरोधही पार मावळला आहे. झाले ते होऊन गेले. आता उगाळू नयेसे वाटते. शेवटी बापू 'बापू' होते म्हणून उषाची 'उषाकिरण' झाली हे मला विसरून चालणार नाही. आणि बापूंचेच अर्थ-वादी रक्त माझ्याही शरीरातून खेळते आहे–फक्त त्यातले अर्थ-वादाचे प्रमाण जरा कमी. आणि मनोहरनी माझ्यातला उरला सुरला अर्थवादही नकळत काढून लावला. ते अबोल, निगर्वी, कृतिशील ध्येयवादी आहेत. अर्थ-संपत्ती-हे त्यांना आयुष्याचे उद्दिष्ट कधी वाटतच नाही, ते जगण्याचे आणि जगवण्याचे एक साधन आहे असे त्यांना वाटते. असे आता मलाही वाटते. गंमत सांगू का ? त्यांना आणि मला हा फरक हळूहळू लोपत चालला आहे. मधली रेषा कुणास ठाऊक केव्हा पुसली गेली ! आवडीनिवडी नि रागलोभाचे तेवढे सोडले–कारण ते स्वतः या बाबतीत सदा हसतमुख स्थितप्रज्ञ आहेत–तर बाकी सारे जे त्यांचे ते आता

माझेच आहे. एकटी बसले की माझे मलाच माझ्यातल्या मूलभूत बदलाचे नवल वाटू लागते ! असे काही घडू शकते हे पूर्वी मला खोटे वाटले असते. एकच आयुष्य-त्याच्या एका टोकाशी बापू, दुसऱ्या टोकाशी मनोहर. अर्धा भाग भीतीच्या अखंड छायेत पैशासाठी कलेची वेठ मारण्यात सरला, उरलेला अर्धा पैसा ही बिनमहत्त्वाची गोष्ट मानून हलक्याफूल मनाने आयुष्यातल्या जास्त सुंदर, जास्त उच्च गोष्टी समजावून घेण्यात चालला आहे ! कधी कधी वाटते की कुठले तरी एक नक्कीच स्वप्न असले पाहिजे ! बापू किंवा मनोहर.

**दोन्ही सत्य आहेत. पण बापूंशी तुमचे पुन्हा जमले कसे आणि केव्हा ? हा अर्थात निव्वळ साहित्यिकाचा इंटरेस्ट आहे–**

–लग्नानंतर मी एकदा डिफ्थेरियाने फार सीरिअस झाले. डॉक्टरनीही आशा सोडली. बापूंना कुणी तरी म्हणाले, उषाला एकदा भेटून या. तरी बापू भेटले नाहीत. नंतर काही काळाने मला पहिला मुलगा झाला. हीही बातमी बापूंकडे पोचली. आई नातू पाहण्यासाठी उतावळी झाली पण बापू तरीही आमच्याकडे आले नाहीत. आई बापूंना नकळता मला चोरून फोन करी; मूल कसे वाढवावे याच्या अनुभवी सूचना देई. अगदी अली–अलीकडे मनोहर एकदा रात्री, अगाऊ न कळ-वता फार उशीरा घरी आले. मी जागी होते. मी विचारले उशीर का झाला, तर उडवाउडवी केल्यांनी. सकाळी म्हणाले, माझ्याबरोबर जरा चल. मला वाटले काही खरेदी करायची असावी. आम्ही निघालो ते माझ्या माहेरच्या इमारतीशी पोचलो. मी रागाने मनोहरना म्हणाले, आपण कुठे चाललो आहोत ? मनोहर शांतपणे म्हणाले, तुझ्या वडिलांकडे. मी फणकारले, मी तिथे पाऊल ठेवणार नाही हे तुम्हांला चांगले ठाऊक आहे ! परत चला. मनोहर ओठांवरचे कायम स्मित हरवू न देता लहान मुलाला समजवावे तसे म्हणाले, हे बघ उषा, तू माझे ऐकणार ना ? मी म्हणतो म्हणून तुला यायला हवे.

इथे अपील नव्हते. आपण आपल्या माहेरच्या उंबऱ्यावाटे मनोहरांमागून आत पाऊल टाकले. पुष्कळ वर्षांनी पुन्हा एकदा ते आपल्या दीर्घ परिचयाचे ठिकाण पाहिले. वाटले की इथे आपले निष्पाप बाल्य हरवले ! इथे मोबदल्यात बापाविष-यीच्या भयाचे चिरडून टाकणारे ओझे मिळाले. इथे लिलीताईची सुखद संगतसोबत लाभली आणि इथूनच ती दुरावून आपण एकाकी झालो. इथे क्वचित् एखाद्या उसंतीच्या क्षणी निर्भर हसलो खिदळलो आणि इथूनच घेणेकऱ्यांना हातापाया पडून परतविण्याचे काम लिलीताईच्या जोडीने कोवळ्या वयात चोख पार पाडले...

आत बापू बिछान्यात होते. आई दुःखी कष्टी होती. भावंडे एवढाली तोंडे करून होती. मनोहरांना पाहून सारे चेहरे उजळले. आपल्याकडे बापू वगळून सारे प्रथम आशंकेने आणि मग हर्षभराने पाहू लागले. भावंडांनी आपल्याला घेरले.

बापू डायरियाने फार आजारी होते आणि त्यांनी स्वतःच धीर सोडला होता.

बडे डॉक्टर गाठून गुण येत नाही असे पाहून आदल्या दिवशी मनोहरांना फोन केला होता. मनोहर रात्री उशीरसर राहिले होते ते बापूंच्या उशाशी, त्यांना धीर देत आणि योग्य चिकित्सेची नि उपचारांची तजवीज करीत. बापूंनी आमचे हात हाती घट्ट धरले नि ते गदगदून रडले. तुमच्यामुळे मला आज जीवदान मिळते आहे असे म्हणाले. त्यानंतर माहेरचे दळणवळण सुरू झाले आणि ते चालू राहिले आहे.

**—हाही योगायोग फार विलक्षण आहे, नाही ?**

माझे सगळे आयुष्यच त्या अर्थाने विलक्षण आहे. त्यात पुष्कळ आणि अपेक्षेबाहेर चांगले घडले आहे पण त्यासाठी आधी अपेक्षेबाहेर वाईट घडावे लागले आहे. मी आधी यशस्वी ठरले आणि नंतर बऱ्याच काळाने या यशाची चव मला कळू लागली. ती कळते आहे तोवर यश भूतकाळाचा भाग झाले आणि जिभेवर फक्त ती चव राहिली आहे; नव्या यशाची अपेक्षा करीत. पण ते यश कदाचित येणारही नाही. तरीही मी दुःखी आहे असे नाही. मी सांगू का ? कदाचित् बऱ्याच माणसांची आयुष्ये अशीच असत असतील. फक्त कुणाला ती कळत नसतील. जे जगते त्यालाही नीटसे आपले आयुष्य कळतेच असे नाही. माझेच असे फार झाले. अलीकडे आपण जे जगतो ते समजावून घेण्याची इच्छा होऊ लागली आहे. श्रेय अर्थात—

**—मनोहरांना. पण एक विचारू ? या माणसाचे एवढे उल्लेख तुम्ही करता आहा, एवढ्या आदरभराने करता आहा, प्रेमाने करता आहा, आणि हे सारे फार आतआतले आहे, खरेखुरे आहे हेही कळते आहे—या महाभागाचा जबरदस्त हेवा वाटतो !**

तसेच ते आहेत. म्हटले ना, दोन टोकेच परमेश्वराने माझ्या पदरी घातली. तसा जन्मदाता, असा पुनर्जन्मदाता ! हाच शब्द त्यांच्या बाबतीत योग्य ठरेल—पुनर्जन्मदाता. ते कसे आहेत ते त्यांना अधूनमधून भेटून पुरते कळणार नाही. इतकी वर्षे सहवासात काढून मलाही कदाचित ते पुरते कळलेच नसेल. मित्रांना ते गमतये आणि प्रसन्न वाटतात. पण ते फार फार गंभीर आणि विचारी आहेत. अनेक त्यांना अबोल मानतात. पण त्यांचा एकेक शब्द शंभर शब्दांचे काम करतो. प्रेमात, संकटात, भांडणात, साध्या चर्चेत देखील. ते मनमिळाऊ वाटतात पण काही गोष्टींबद्दलचा त्यांचा निर्धार फार फार कणखर असतो. ते वृत्तीन तत्त्वज्ञानी आहेत पण व्यवहारात जगताना व्यवहार ते चोख सांभाळतात—प्रसंगी जरूर त्याहून जास्तच चोख. मागे—मध्ये ते अमेरिकेला शिक्षणासाठी गेले. जाण्याच्या आदल्या रात्री ते जाणार म्हणून मी विलक्षण बेचैन होते तर ते माझ्या चित्रपटांतल्या मिळकतीचे हिशेब आणि बँकबुके घेऊन माझ्यासमोर येऊन बसले. मला म्हणाले उषा, उद्या मी निघणार. परत येईनच पण माणसाने कसली आंधळी खात्री बाळगू नये. प्रवास लांबचा आहे, देशही इथून दूरचा आहे. माझे समज तिथे काही बरेवाईट झाले, तर तुझ्या पैशाचा हिशेब तुला माहीत हवा. म्हणून हे सारे समजावून ताब्यात घ आणि मला मोकळा कर.

माझा गळा दाटला; पण ते शांत होते. माझ्या कैक हजारांच्या मिळकतीची जिम्मेदारी त्यांनी वाहिली पण कधी कपर्दिकही स्वत:साठी उचलली नाही—नवरा असून! आमचे लग्न झाले आणि दारी गाडी आली. पण ते टॅक्सी नाहीतर बसने कुठेही जात. म्हणत, गाडी तुझ्या मिळकतीची आहे. बायकोच्या मिळकतीवर हा आयता जगतो असे माझ्याविषयी कुणी म्हटलेले तुला आवडेल का? जेव्हा त्यांच्या मिळकतीतून त्यांनी गाडी घेतली तेव्हाच त्या गाडीने ते जाऊ येऊ लागले.

पण हा कटाक्ष ठेवूनही माझ्या यशाचा, कीर्तीचा, पैशाचा मत्सर या माणसाने कधीही केला नाही. उलट मला अधिकाधिक संधी उपलब्ध व्हावी म्हणून ते लहान मुलाच्या उत्साहाने प्रयत्न करून अनेक योग आणीत. ते अमेरिकेला गेले त्यांच्या-मागून जिद्दीने आणि माझ्या वेगळ्या प्रयत्नांनी मीही गेले. तिथे त्यांनी परस्पर खटपट करून स्थानिक टेलिव्हिजनवर माझ्या गाण्याचा कार्यक्रम ठरवला! मी संकोचू लागले तेव्हा म्हणाले, इथे आपले संगीत कुणाला विशेष कळते आहे? तू तुला येईल तसे मेहनतीचे गा. टेलिव्हिजनवर तू येणे महत्त्वाचे आहे. त्यांनीच मला टेलिव्हिजनच्या संगीत घोड्यावर बसवले आणि नंतरचे चौफेर होणारे माझे कौतुक ऐकताना मात्र मला पुढे करून ते मागे होते. माझ्या एखाद्या चित्रपटाच्या 'प्रीमि-अरला' माझ्याभोवती गर्दी होई. अशा वेळी लांब राहून मंद हसत ते समाधानाने माझ्याकडे पाहत असलेले दिसत. त्याबद्दल टोचून बोलणे तर राहोच पण लटक्या थट्टेचे उल्लेखही सहसा करीत नसत.

माझी कीर्ती त्यांना मान्य असते पण खुषमस्करी किंवा तोंडदेखली प्रशस्ती मुळीच मान्य होत नाही. दहा माणसे प्रशंसा करतील त्यानंतर त्यांचे मत व्यक्त होईल ते सौम्य शब्दांत, काय कमी पडले तेवढेच दाखवून देणारे. अशा वेळी मी फणकारले की म्हणतात, तुझी फक्त स्तुती करणारे उद्या तुझे काम वाईट होऊ लागले तर सांगायला येणार नाहीत. मी काळजी घेतो ती तसे काही न व्हावे, याची. मला तुझे काम आणखी चांगले व्हावे असे वाटते. म्हणून मी दोषच दाखवणार.

बदल्यात स्वत:चे कौतुक नवरेपणाच्या हक्काने कधीही करून घेणार नाहीत. यांच्या यशाच्या, मानसन्मानाच्या बातम्या माझ्या कानी नेहमी याव्या त्या बाहेरून कुठून तरी! यांना विचारावे तर म्हणतील, अनेकांकडून जे घडते, ते मी केले. त्यात असे आवर्जून सांगण्यासारखे काय होते? सुवर्णपदके काय कुणाला मिळत नाहीत? पहिले काय कुणी येत नाहीत; असल्या गोष्टींचे उगीच फार कौतुक कशाला?

जगण्याचे त्यांचे स्वत:चे काही एक तत्त्वज्ञान आहे आणि फार बभ्रा न करता त्याप्रमाणे ते न चुकता जगत असतात. कुणाविषयी कुत्सितपणे किंवा केवळ चौकस-पणे काही बरीवाईट चर्चा त्याच्या मागे सुरू झाली की यांना कंटाळा आलाच! ते पहिल्या क्षणाला त्या बाहेर पडतील. एकदा आम्ही मत्रिणी कसलेसे नाटक बघून

परतत होतो. मनोहर गाडी ड्राइव्ह करीत होते. आमच्या कुणाविषयी तरी अशा पश्चात-गोष्टी निघाल्या. मनोहर गप्प होते. मध्येच एकदा ते म्हणाले, जाऊ दे ना, आपण काही चांगले बोलू. तरीही तो विषय चालूच राहिला तेव्हा त्यांनी शांतपणे गाडी रस्त्याकडेस उभी केली, चाव्या माझ्याकडे टाकल्या आणि चालू लागले.

युगोस्लाव्हियाला १९५५ साली एका सांस्कृतिक शिष्टमंडळातून मी गेले, तेव्हा पूर्वतयारीची सारी धावाधाव त्यांनी मला करायला लावली. मी चिडले तरी ते चिडले नाहीत. मला वाटले, कठोर-कठोर आहेत ! पण पुढे त्यांच्यामागून स्वतःच्या हिंमतीवर अमेरिकेला गेले तेव्हा आधीची धावाधाव आणि पूर्वतयारीची माहिती नेमकी कामी आली आणि मन कृतज्ञतेने तुडुंब भरले. वाटले की, न बोलता हा माणूस मला शिकवून शहाणी करतो आहे ! असे प्रत्यय तर पुष्कळदा त्यांनी मला दिले आहेत. माणसाने परावलंबी असू नये, याबद्दल त्यांचा फार मोठा कटाक्ष असतो. मोठा मुलगा आठ–एक वर्षांचा असेल; तेव्हा त्याला मुलांच्या एका नाटकाला जायचे होते. मनोहर म्हणाले, नेतो, पण परत एकटे यायचे. नाटक होते प्रभादेवीला, घर वांद्र्याला, पोराचे वय जेमतेम आठ वर्षांचे. पण मनोहरांनी त्याला एकट्याला नाटकाला नेऊन सोडल्यांनी. वाटेत परत कसे यायचे, याची कल्पना आणि बसचे भाडे देऊन ठेवल्यांनी. आणि आले परत. नाटक सकाळचे. सुटणार होते दुपारी १२ च्या सुमारास. दुपारचा १ वाजला तरी पोरगा आला नाही. माझ्या जिवात जीव नव्हता. पण हे शांत होते. मी म्हणाले, एवढ्या लहान वयात कशाला करायला लावायचे हे त्याला ? काही झाले म्हणजे ? वाटबीट चुकेल, त्यात हे अफाट शहर. तरीही मनोहर शांत होते. मुलगा सुखरूप आला. त्याचा आत्मविश्वास विलक्षण वाढला होता. मनोहरनी वास्तविक म्हणायचे की पाहिलेस ? यासाठी मी तसे केले. पण ते काही म्हणालेच नाहीत. ते फक्त वागतात. अर्थ काढायचे ते आपण. आणि हा अर्थ नेहमीच फार फार चांगला निघतो. आता सवयीने त्यांच्या कृतीआधी हे अर्थ माझ्या ध्यानी यतात आणि माझे पूर्वीचे चिडचिडणे घडत नाही. तरीही एखाद्या वेळी ' विकेट ' जातेच. न कंटाळता आणि अधिर न होता फार परिणामकारक मंदगती गोलंदाजी करणाऱ्या गोलंदाजाशी मला या माणसाचे नाते भासते. अशा माणसापुढे फार जपून आणि नम्र होऊनच खेळावे लागते ! आवेशाने आणि तडफेने उगीच काही करू गेले ना, तर आपलेच हसे व्हायचे हे ठरलेले...पुन्हा तो या हसण्यात सहभागी नाही व्हायचा...तसाच अबोलपणे आपल्याला त्या अवघड प्रसंगातून बाहेर येण्याला मदत करील. सहा महिन्यांनी ओघाओघात एकच वाक्य नाहीतर शब्द स्वभावगत सौम्यपणाने पण नेमकेपणाने असा बोलेल की, ज्यातून आपल्याला कळायचे ते कळून जाईल...विलक्षण आहे बघा, फार विलक्षण...

थँक्स, उषाबाई. तो माणूस–काही दिवस लागोपाठ त्या 'शुभं करोति' नावाच्या बंगलीला, त्या दिवाणखान्याला आणि

त्यातल्या त्या छोट्याशा सुंदर जगाला सरावलेला तो उपरा, उत्सुक माणूस—स्वतःला आवरून उठतो. आता त्याला जाणून घ्यायचे ते बव्हंशी संपलेले असते. त्याला चौदिशा फिरविणारी त्याची अनावर उत्सुकता तात्पुरती निवलेली असते. त्या बंगलीतल्या जगातली लहानमोठी अगणित सुखदुःखे आता त्याची झालेली असतात. त्या जगाचे कोनेकोपरे त्याच्या दृष्टि-पथात असतात आणि तरी काही राहून जात असल्याची हुरहूर असतेच. ही नेहमीच असते. तो निरोप घेतो आणि बाहेर पडतो. त्याला वाटते की ही झाली 'उषाकिरण' नामे एका भूतपूर्व चित्रपट तारकेची जीवन कहाणी. खरे म्हणजे चित्रपट



तारकेपेक्षा एका चार चौघींसारख्या पण फार फार कष्टाळू, फार सरळ मनाच्या आणि मुख्यत: भावुक मुलीची एकाच वेळी दुर्दैवाने आाण महद् भाग्याने अर्थपूर्ण झालेली जरा वेगळी कहाणी. 'चित्रपट तारके'च्या रंगरंगोटीमागे कुणास ठाऊक अशा किती कहाण्या गुदमरून जात असतील....

छापल्या जातात त्या यशाच्या आणि कीर्तीच्या साचेबंद कथा; त्याच त्या रेखीव आणि कोरीव नाकडोळ्यांच्या आणि पुष्ट उरोजांच्या छायाचित्रांनिशी.

फावल्या वेळी नजर टाकायला त्याच बऱ्या असतात म्हणे ! असोत बिचाऱ्या....

समाप्त

२८ डिसेंबर १९६८

# जागतिक चोर संमेलन

**। । । । । । । । । । । । । ग. पां. फडके । । । । । । । । । । । ।**

चार वर्षांपूर्वी पाश्चात्य देशांत भरलेल्या संमेलनाच्या आवाहनाला अनुसरून जी एक जागतिक संघटना स्थापन करण्यात आली तिच्या विद्यमाने हे पहिलेच संमेलन भारतात–मुंबई नगरात–भरविण्याचे ठरविण्यात आले. भारतात ते भरवण्याचे कारण असे सांगण्यात आले की, या भारत देशात स्वकीय व परकीय, सुष्ट व दुष्ट सर्व लोकांना सारख्याच मानाने वागविण्यात येते. भारत देशातील काही नतद्रष्ट लोक वगळल्यास अशा सर्व तऱ्हेची सर्व संमेलने व परिषदा यांना सर्व तऱ्हेच्या सवलती दिल्या जातात. संमेलनाच्या प्रतिनिधींसाठी म्हणून पुढील अटी घालण्यात आल्या–१) जगातील कोणत्याही न्यायालयाने त्याला कमीत कमी १ वर्षाची शिक्षा दिलेली आहे, अशा तऱ्हेचे प्रशस्तिपत्रक सोबत जोडण्यात यावे. (२) अत्याचार व स्त्रियांवर बलात्कार हे चौर्यकर्मामध्ये येत नसल्यामुळे अशा गुन्हेगारांना या संमेलनात स्थान मिळणार नाही. (३) काळाबाजार व लाचलुचपत या गुन्ह्यांबद्दल शिक्षा झालेल्यांनाही परिषदेत स्थान नाही. (४) संमेलनाचा प्रतिनिधी कोणत्याही सरकारी अधिकारावर असता कामा नये. (५) तो मधुरभाषी व मनमिळाऊ असावा. (६) धर्म, जात, वंश या बाबतीत भेदभाव करण्यात येणार नाही. (७) संमेलनास उपस्थित राहताना त्यांनी कोणत्याही तऱ्हेचे वेषपरिवर्तन केलेले नसावे. (८) तो कोणत्याही राजकीय पक्षाचा उघड सभासद असता कामा नये. (९) संमेलनात संमत झालेले सर्व ठराव गुप्त ठेवण्याबद्दल त्यांनी आपापल्या पवित्र ग्रंथावर हात ठेवून शपथ घेतली पाहिजे. (१०) अत्याचारविरहित केलेल्या चौर्यकर्मांत यशस्वी भाग घेणाऱ्यांना विशेष मान दिला जाईल.

संमेलनास आलेल्या १००० प्रतिनिधींची वाटणी खालील प्रमाणात होती– अमेरिका २५, पाकिस्तान १२ (या देशात होणाऱ्या गुन्ह्यांत स्त्रियांवर होणारे बलात्कार व अत्याचार यांमुळे हजारो लोकांना प्रतिनिधित्व नाकारण्यात आले.), रशिया १००, चीन २५०, अरब राष्ट्रे १००, आग्नेय आशियायी राष्ट्रे १००, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड प्रत्येकी ५०, फ्रान्स व जर्मनी प्रत्येकी २५ व भारत यजमान राष्ट्र म्हणून त्याचे १०० प्रतिनिधी उपस्थित होते. इतर राष्ट्रांतूनही काही प्रतिनिधी आले होते.



अध्यक्षस्थानावरून भाषण करताना श्री. चष्मेवाले म्हणाले, "पूर्वीपासून म्हणजे फार प्राचीन कालापासून हा मार्ग प्रचारात आलेला आहे. मृच्छकटिक नाटकातही शर्विलक आहेच. चोर हा एका प्रकारे समाजवादाचा पुरस्कार करणारा आहे. श्रीमंत लोकांकडे एकत्रित केलेली संपत्ती अत्याचारविरहित रीतीने, त्या मालकालाही न कळता काढून घेऊन तिचे वाटप आपल्या भागीदारांत अर्थात समाजात करणे हाच समाजवाद आहे. भांडवलदार वर्गाविरुद्ध आमचा आक्षेप नाही. तो वर्ग अवश्य अस्तित्वात असला पाहिजे; कारण तो जर का नसेल तर आम्हांला आमची अक्कलहुशारी दाखविता येणार नाही म्हणून 'भांडवलशाही नष्ट करा' असे म्हणणाऱ्या कम्युनिस्टांचा आम्ही निषेध करतो.

"जगातील वर्गकलह हा जगाच्या सुरुवातीपासून अस्तित्वात असल्यामुळे तो जगाच्या अंतापर्यंत चालू राहणार असा आमचा दृढ विश्वास आहे. पोलिसखाते व न्यायाधीश यांना जरी आम्ही शत्रू वाटत असलो तरी आम्ही त्यांचे मित्र आहोत ही गोष्ट त्यांनी अवश्य ध्यानात धरावी. जर आमचे अस्तित्व नसते तर त्यांना उदर-भरणासाठी दुसरा मार्ग शोधावा लागला असता. म्हणून ज्यांच्यामुळे आपले अस्तित्व कायम राहते अशा आम्हा चोरांना त्यांनी आपले मित्र मानावे, अशी माझी त्यांना नम्र विनंती आहे. चोऱ्या जितक्या जास्त होतील तितकी आपली हुशारी अधिक प्रकर्षाने दाखविण्याची त्यांना संधी मिळेल व त्या प्रमाणात त्यांना बढत्याही मिळतील. म्हणून त्यांनी या व्यावसायिकांकडे अत्यंत आत्मीयतेने पाहावे, अशी आमची त्यांना विनंती आहे.

"लाचलुचपत व काळाबाजार करणारांना लोक चोर म्हणतात या गोष्टीचा आम्ही निषेध करतो. लाचलुचपत व काळाबाजार ही दोन्ही अंगे भांडवलशाहीला पोषक आहेत म्हणूनच ती आमच्या समाजवादाविरुद्ध आहेत. तसे करणारांची नावे अवश्य प्रसिद्ध व्हावीत म्हणजे त्यांनी मिळविलेल्या काळ्या पैशाला त्यांच्यापासून दूर करण्यात आम्हांला मार्गदर्शन होईल. लाचलुचपत व काळाबाजार करणाऱ्यां-कडून चोरून आणलेले धन हे पापात जमा करू नये अशी आम्ही यमधर्माला विनंती करतो. पापाने मिळविलेला पैसा चोरणे हा गुन्हा होत नाही असे एक कलम

आपल्या भारतीय दंडविधान कायद्यात समाविष्ट करण्यात यावे व तशी घटनेतही दुरुस्ती करण्यात यावी.

" लाचलुचपत व काळाबाजार करणारे हे समाजद्रोही आहेत व समाजवादाच्या भूमिकेनुसार त्यांच्याकडून तो पैसा काढून घेऊन समाजात खेळता ठेवणारा चोर याला समाजाने आपला मित्र मानावे, अशी आमची विचारी समाजधुरिणांना नम्र विनंती आहे. अशा समाजवादाचा प्रसार करताना चोर हा 'पकडला जाणे,' 'शिक्षा मिळणे' वगैरे धोकेही पत्करीत असतो. हा त्याचा वैचारिक व शारीरिक त्याग लोकांनी अवश्य विचारात घेतला पाहिजे.

" इंग्लंडमध्ये गाडी लुटून सरकारी खजिना अक्कलहुशारीने लांबवणारे व नंतर तुरुंगातून तीस वर्षांऐवजी तीन महिन्यांत पळून जाणारे चोर हे अत्यंत स्पृहणीय अशा व्यक्ती आहेत. आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. पण त्यात काही व्यक्तींना जखमा झाल्याबद्दल संमेलनास फार वाईट वाटते व असा शारीरिक अत्याचार पुन्हा होणार नाही याकडे संमेलनाने लक्ष द्यावे. जखमींना दाखविलेल्या सहानुभूतीचा ठराव त्यांच्या नातेवाईकांकडे पाठविण्यात यावा व चोरलेल्या पैशांतून त्यांचे झालेले आर्थिक नुकसान भरून देण्यात यावे. अमेरिकेत बँकांवर पडणारे दरोडे अतिशय कौतुकास्पद असतात; पण त्यात अत्याचार होत असल्यामुळे आम्ही त्यांचा निषेध करतो. अमेरिकेच्या अध्यक्षांना आम्ही अशी विनंती करतो की, अशा अत्याचारी खुन्यांना त्यांनी मुळीच दयामाया दाखवू नये व त्यांना चोर न म्हणता खुनी म्हणण्यात यावे. अमेरिकेत चोरी करताना स्त्रियांवर होणारे बलात्कार, वगैरे गोष्टींचा आम्ही निषेध करतो. असे करणे हा आम्हा चोरांचा अपमान आहे. अशा लोकांनाही 'चोर' ही संज्ञा देण्यात येऊ नये. यामुळे आम्हा चोरांच्या पवित्र समाजकार्यावर शितोडे उडविले जातील अशी शिफारस हे संमेलन करीत आहे.

स्वतःला चोर म्हणवून घेणारांनी गरीब लोकांना कधीही लुबाडू नये; कारण त्यामुळे फुकट पकडले जाण्याची व शिक्षा होण्याची भीती असते. सोन्याचे दागिने चोरताना त्याची नीट पारख करावी. कारण अंबर गोल्ड, रोल्ड गोल्ड, वगैरे कित्येक नावांनी नकली सोने बाजारात चालू आहे. सोन्याचा शुद्धपणा चटकन तपासता येईल, अशी एखादी युक्ती आम्ही लवकर शोधून काढू, याची आम्ही सभासदांना हमी देतो. त्याचप्रमाणे हिरे, रत्ने, मोती चोरतानादेखील अत्यंत दक्षता बाळगली पाहिजे. श्रीमंत समजल्या गेलेल्या स्त्रियासुद्धा हल्ली नकली दागिने वापरून श्रीमंतीचे सोंग आणतात. सबब सावधान राहा. चोरी करताना वापरण्यात येणारी उपकरणे संपूर्णतः स्वदेशी असावीत. आपल्या संमेलनाच्या कार्यकारी मंडळापुढे उपकरणे बनविण्याचा एक कारखाना काढण्याची एक योजना आहे. प्रत्येक चोराने त्यासाठी कमीत कमी शंभर रुपयांचा एक भाग घेऊन योजनेला सक्रीय मदत करावी."

अध्यक्षांचे भाषण झाल्यानंतर संमेलनाचे कार्यवाह श्री. खटपटखान यांनी थोडक्यात आपले भाषण संपविले. ते म्हणाले, "आपल्या भारत राष्ट्रात धर्म, पंथ, जात वगैरे गोष्टी मानल्या जात नाहीत. तरीसुद्धा काही ठिकाणी जातीयतेचा वास येतोच. पण मी छातीवर हात ठेवून सांगतो की आमच्या संप्रदायामध्ये जात, धर्म, वंश, पंथ हा भेदभाव नाही. रोजची वर्तमानपत्रे आपण वाचीत असालच, त्यांत तुम्हांला हेच आढळून येईल की अंतोन, अबदुल्ला आणि अनंत ही सर्व मंडळी एकदिलाने एके ठिकाणी काम करीत असतात. देवस्थानांमध्ये चोरी केली जाऊ नये असे माझे प्रांजल मत आहे. कारण तसे करण्याने भावना दुखावल्या जाण्याची शक्यता आहे. संघटितरीतीने काम केल्यास आपणसुद्धा आपली एक स्वयंसेवक संघटना उभी करू शकू. आपल्या राष्ट्राचे स्वातंत्र्य कायम टिकावे म्हणून प्रत्येक राष्ट्रातील चोरांनी दुसऱ्या राष्ट्रांशी लढण्याचा प्रसंग येऊ नये अशी वैचारिक भावना ठेवावी. राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये चोरीच्या गुन्ह्याबद्दल तो आपल्या राष्ट्रात पळून आल्यास परत करावे असा जो नियम आहे, तो रद्द करण्यात यावा, अशी राष्ट्रप्रमुखांना आमची विनंती आहे."

हारतुरे व पदके अर्पण करून आभार प्रदर्शनानंतर संमेलनाचे काम संपले. ○

## पेलाभर उपदेशामृत

दोन पाश्चिमात्य तरुणांनी ८० दिवसांत पृथ्वी–प्रदक्षिणा करण्याची शर्यत लावली आहे. जो हरेल त्याने जिंकणाऱ्याला एक ग्लास बियर पाजायची, असे ठरले आहे. आहे की नाही गंमत? उद्या प्रेसिडेंट जॉन्सन कोसिजिनला म्हणतील–चंद्रावर आधी कोण पोचतो याची शर्यत लावू या. जो हरेल त्याने जिंकणाऱ्याला कोकाकोला पाजायचा! अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीसाठी उभ्या राहिलेल्या मंडळींतही अशीच चुरस लागायची–जो निवडणूक हरेल त्याने नवीन अध्यक्षाला हॉट् डॉग खायला घालायचा! आपल्याकडेही अशा बऱ्याच पैजा लावता येतील. पंतप्रधानांच्या बंगल्यासमोर सतत महिनाभर कोण "धरणा" देईल? जिंकेल त्याला इंदिराजींच्या बहुमूल्य उपदेशामृताचा एक घुटका बक्षीस. अभिमन्यूवर ताण करून कोठला कारखानदार आपल्या भोवतालच्या "घेराव" म्हणून निसटून दाखवील? जिंकेल त्याला "वीर अभिमन्यू" सिनेमाचे एक तिकीट फुकट. कोणत्याही नेत्याचे भाषण शेवटपर्यंत न झोपता कोण ऐकून दाखवील? त्याला ॲस्प्रोच्या दोन गोळ्या बक्षीस अन् शेवटी कोठल्याही ऑफिसात कामापेक्षा आराम नक्की किती पट जास्त असतो याचे अवघड गणित आधी कोण सोडवून दाखवील? जिंकेल त्याला गरमागरम मसाला डोसा.



# आव्हान

अनंत द. भालेराव

आम्ही म्हणजे मी, छोटू आणि टिपू नानांकडे गेलो तेव्हा ते काहीतरी वाचीत बसले होते. आम्हांला पाहताच ते तोंडभर हसत म्हणाले,

"या ! या !"

"आलो ! आलो !" आम्ही म्हणालो.

"बसा असे" ते म्हणाले.

आम्ही त्यांच्याभोवती कोंडाळं करून बसलो.

नानांशी आम्ही मैत्री करावी याचं सर्वांनाच आश्चर्य वाटतं. अगदी त्यांच्या पत्नी म्हणजे नानींनासुद्धा! यावरून त्या नानांना बोलतात, पण नाना तिकडे दुर्लक्ष करतात. आम्ही फिरायला जाताना नेहमी नानांना बरोबर घेतो. अगदी चित्रपटनाटकांना जातानासुद्धा

आम्हांला नाना हवे असतात. ह्याचं मुख्य कारण म्हणजे नानांचं बोलणं. आम्ही त्यांच्याशी कुठल्याही विषयावर बोलत असतो आणि तेही वयोभेद विसरून आमच्याशी समरस होतात. खरं तर नानांनी लेखक व्हायला हवं होतं. त्यांचा अनुभवसाठा खूप आहे, तसंच त्यांची निवेदनशैलीसुद्धा छान आहे. कधी फिरण्याचा मूड नसला म्हणजे आम्ही त्यांना गोष्टी सांगायचा आग्रह करतो किंवा गप्पांच्या ओघातच एखादा विषय निघतो आणि नाना मग म्हणतात,

" थांबा. तुम्हांला एक किस्साच सुनावतो."

मग त्या किस्सा सुनावण्यात दीड-दोन तास कसे जातात कळत नाहीत. असे हे नाना!

" अरे, आज गोपू नाही ?" नानांनी विचारलं.

" नाही आला खरा !" मी म्हणालो.

" तीन-चार दिवस येणारही नाही कदाचित् "–टिपू

" कदाचित आठ-दहा दिवसही ! "–छोटू

" पण झालं काय ?" नाना म्हणाले.

" त्यांचा अपेक्षाभंग झाला," मी म्हणालो.

" त्याचं भावविश्व भग्न पावलं !" टिपू म्हणाला.

" त्याचं स्वप्न अपुरंच राहिलं !" छोटू म्हणाला.

" अरे, पण का ?"

" त्याला शिला गुप्तेनं नकार दिला. "–टिपू.

" त्याचा प्रेमभंग झालाय. "–मी व छोटू.

" म्हणून त्याला आठ-दहा दिवस सुतकाचे आहेत"–टिपू. नाना गडगडाटासारखे हसले. आम्ही अवाक् होऊन त्यांच्याकडे पाहतच राहिलो. प्रेम करणं कदाचित् हास्यास्पद ठरू शकेल पण प्रेमभंग ही निश्चित गंभीर बाब आहे. आणि हा प्रेमभंग आमच्या एका जवळच्या मित्राचा झाला होता, तसाच तो नानांच्या परिचिताचाही झाला होता आणि तरी नाना हसत होते.

" मला वाटतं नाना, प्रेमभंग ही हास्यास्पद बाब नाही !" मी गंभीरपणे म्हणालो.

" आणि हा तर आमच्या जवळच्या मित्राचा झाला आहे." टिपूही गंभीरपणे म्हणाला.

" याचा गंभीरपणे विचार व्हावा." छोटू पराकोटीच्या गंभीरपणे म्हणाला.

" मित्रांनो, मी प्रेमभंगाला हसलो नाही. पण बंडूचं हे वागणं पाहून हसलो. असाच प्रेमभंगाचा प्रसंग आमच्या वेळी म्हणजे मी महाविद्यालयात... "–

" म्हणजे पुण्याला ? " छोटचा.

" होय ! तेथे घडला. अर्थात बंडूनं तसं वागावं असं माझं मत नाही पण

आठवला म्हणून सांगतो."

"सांगा!" मी अधीरपणे म्हणालो.

"झटपट."–टिपू.

"लौकर."–छोटू.

"हो! हो! सांगतो."–म्हणत नाना सांगू लागले आणि आम्ही ऐकू लागलो

"खंडो बल्लाळ! नाव ऐकून दचकू नका. ही एखादी ऐतिहासिक कथा नाही, की हा कुणी ऐतिहासिक महापुरुष नाही. खंडो बल्लाळ आमच्याच महाविद्यालयात आमच्याच, B. A. च्या वर्गात होता. नुकतंच त्याला मिसरूड फुटत होतं. अंगकाठी कृश म्हणता आली नसती पण तो उंच असल्यानं तशी वाटे. रंगानं तो उजळ होता आणि त्याचं नाक सरळ पण लांब होतं. डोळे मोठे आणि काळेभोर होते. अगदी समईच्या शांत प्रकाशासारखे, थोडेसे गूढता दाखवणारे. त्याच्या चेहऱ्यावर गंभीरतेचा अभ्रा असे. नेहमी तो कसल्यातरी विचारांत गढल्यासारखा वाटे. डोक्यानं तो खूप हुशार होता. त्याचं संपूर्ण नाव होतं खंडेराव मल्हारराव बल्लाळ! पण सगळे त्याला खंडो बल्लाळ म्हणत. वर्गातील पहिला बाक आणि परीक्षेतील पहिला वर्ग त्यानं कधीच सोडला नव्हता. सबंध महाविद्यालयात तो अतिशय हुशार म्हणून प्रसिद्ध होता. तशीच मुलींमध्ये 'विश्वामित्र' म्हणून त्याची ख्याती होती. कुठल्याही मुलीकडं त्यानं काही डोळा वर करून (वाकडा तर राहिलाच) पाहिलं नव्हतं. आपल्या सरळ नाकासमोर पाहत चालणारा तो मुलगा होता. तसे त्याला मित्रसुद्धा फारसे नव्हते. तास संपले की एकतर वाचनालय किंवा घर यांपैकी कुठेतरी तो जाई. इराण्याचं किंवा उडप्याचं उपाहारगृह त्यानं आतून कधी पाहिलंही नसावं. त्याचं राहणंही साधं, धोतर आणि धुतलेला स्वच्छ सदरा आणि पायांत चपला. पण गडी इंग्लिश मात्र साहेबासारखं बोलायचा. स्वभावानं तो फार एककल्ली आणि लहरी असावा. आमच्यापैकी एक–दोन जणांनी त्याच्याशी मैत्री करण्याचा प्रयत्न केला पण तो निष्फळ ठरला. त्याचे बोलण्याचे विषय नेहमी राष्ट्र, धर्म, नीती, संस्कृती वगैरे जाडजाड असायचे. त्याचा विषय होता अर्थशास्त्र. अर्थात आमच्या सगळ्यांचा तोच होता पण आम्हांला आहे तोच अभ्यास जड वाटे, खंडोची मात्र या विषयाव्यतिरिक्त पुष्कळ प्रगती होती. साप्ताहिकांतून, दैनिकांतून, मासिकांतून त्याचे लेख, कविता, कथाही प्रसिद्ध व्हायच्या.

असा हा अष्टपैलू विद्यार्थी मुलींबाबत फार उदासीन होता. आपल्या वर्गात मुली आहेत याबद्दल त्याला फार वाईट वाटे. मुलींमागे भटकणाऱ्या मुलांचा तो फार तिरस्कार करीत असे. अर्थात त्याची ही मतं तो न बोलता लेखाद्वारे व्यक्त करी. त्याच्याचसारखा कुणी दुसरा असता तर मुलींमध्ये 'राजा' म्हणून प्रसिद्ध पावता. पण तो होता खंडो बल्लाळ!

रंजना प्रधान! नावंच कसं छान आणि गोड आहे. नाव घेतल्यावर कल्पनेनंच

डोळ्यासमोर मूर्ती साकार व्हावी. आमच्या वेळी महाविद्यालयात येणाऱ्या मुली फार कमी आणि त्यांत अशा सौंदर्यवती आणि तुमच्याच भाषेत सांगायचं तर 'माल' मुली फारच कमी. आमच्या विद्यालयाची ती सौंदर्य-राणी होती. टपोऱ्या डोळ्यांची, लाल लाल ओठांची आणि कमनीय बांध्याची ही रंजना प्रधान आमच्या वर्गात आहे, याचा आम्हांला फार अभिमान होता. वर्गातली बहुतेक सगळी मुलं सगळ्या तासांना बसत. तिच्या साड्यांमध्ये तोचतोचपणा कधीच नसे. प्रत्येक दिवशी वेगळी साडी ती नेसत असे. रंगसंगती साधण्याबाबत तिचा फार कटाक्ष असे. काळ्याभोर भरघोस आणि लांबसडक केसांचा ती कधी एक शेपटा, कधी चक्कर तर कधी सैलसर अंबाडा बांधून येई. आठवड्यातून एक-दोन दिवस ती नऊवारीही नेसून येई. त्या वेळी तिचा बांधा फारच खुलून दिसे. अप्रतिम असं सौंदर्य या वेळी आम्हांला पाहायला मिळे. एखादी सुंदर मुलगी नऊवारीत किती सुंदर दिसू शकते हे तुम्हांला आजच्या मुलांना कळणं शक्य नाही. कारण आताच्या काळात तुमच्या दृष्टीस पडणं शक्यच नाही. आजच्या मुलींची प्रकृतीच मुळी काठीसारखी असते. त्या नऊवारी नेसता नेसताच दमणार. असो. रंजना प्रधानचं सौंदर्य हे आमच्या महाविद्यालयाचं भूषण होतं. ती आली नाहीतर आम्हांला वर्ग सुना सुना वाटे. तासांना लक्ष लागत नसे. ती का आली नाही याची काळजी आमच्या मनात घर करून राही. तिच्या सगळ्या मैत्रिणी दिसायला अगदी सुमार होत्या. त्यांच्या घोळक्यात ती अगदी उठून दिसे. तशा मैत्रिणी तिनं मुद्दाम ठेवल्या होत्या की काय हे कळायला मार्ग नव्हता. सर्व प्राध्यापकांशी तिची चांगली ओळख होती. तसंच प्राचार्यांचंही तिच्या घरी येणं-जाणं होतं. तिची आर्थिक स्थिती गबर होती. तिचा बाप बॅरिस्टर होता आणि पुण्यात त्या वेळी बॅ. प्रधान हे नाव गाजत होतं. त्यांच्या घरी दोन मोटरगाड्या होत्या. पण घरच्या गाडीनं ती क्वचितच येई. तिची चाल विलक्षण सुंदर होती. चालताना तिचा लांब शेपटा नितंबावर हलके हलके आपटे आणि त्या झोक्यावर आमची काळीजं हलत असत. तिचं बोलणं, हसणं, बघणं असंच विलक्षण होतं. तिचा आवाज फार छान होता. ती हसली की ओष्टद्वयांतून चमकणारी ती पांढऱ्या शुभ्र दातांची ओळ विलक्षण सुंदर दिसे. तिनं आमच्याशी एखादा शब्द बोलावा, एकदा पाहून हसावं, टपोऱ्या डोळ्यांनी एकदा आमच्याकडे (कृपा) दृष्टी वळवावी, एखाद–दोन पावलं आमच्याबरोबर चालावं यासाठी आम्ही धडपडत असू.

आपल्या ह्या सौंदर्याची जाणीव तिला पुरेपूर होती. पण हे सौंदर्य डागळलेलं होतं. चंद्रावर डाग आहेत ना तसं! तिच्या सौंदर्याभोवती दुष्कीर्तीचं खळं होतं. तिची 'प्रकरणं' फार होती. महाविद्यालयाच्या चार वर्षांत तिनं जवळ जवळ दहा-बारा प्रियकर बदलले असतील. तपशीलच द्यायचा झाला तर असा देता येईल : पहिल्या वर्षी पहिल्या टर्ममध्ये ती सुधेन्दू रॉय या मुलाबरोबर भटकायची तर दुसऱ्या टर्ममध्ये

तिनं देवचन्द्र जैन गाठला. दुसऱ्या वर्षी ती अविनाश रेळेबरोबर भटकायची. हे प्रकरण फारच गाजलं. स्वत: अविनाश टेळे हा उमदा गडी होता. आमच्या क्रिकेट टीमचा कप्तान होता. दिसायलाही खूप छान होता. त्यांचं लग्न होणार हे आम्हांला स्पष्ट दिसत होतं. पण अवीला तिनं परीक्षेपूर्वीच रामराम ठोकला. आम्हांला आश्चर्याचा जबरदस्त धक्का बसला. तिसऱ्या वर्षी ती मनोहर साठे आणि देवदास जोशी यांना झुलवीत होती. मनोहर साठेनं तर जीवच दिला आणि नाटकवेडा देवदास तिच्यासाठी वेडा होऊन ठार वेडा झाला. हे ठळक सोडले तर इतर पुष्कळ प्रियकर तिला होते. ही तिची 'कीर्ती' माहीत असूनसुद्धा दरवर्षी तिच्यासाठी मुलं लोभावत.

ह्या दोन व्यक्तिरेखा तुमच्यासमोर ठेवल्यात. एकमेकांपासून त्या भिन्न आहेत. त्यांचे स्वभाव, गुणदोष, जीवनाकडे पाहण्याचे दृष्टिकोण भिन्न आहेत. ह्या दोन विरुद्ध ध्रुवांमध्ये निर्माण झालेल्या आकर्षणाचीच कथा तुम्हांला ऐकवतो.

रंजना प्रधानच्या सौन्दर्याचा दबदबा महाविद्यालयात होता तसाच खंडो बल्लाळच्या हुशारीचा गवगवाही होता. तिच्या सवंगपणाची कीर्ती होती तशीच त्याच्या 'विश्वाभिषत्वाची' ख्यातीही कमी नव्हती. हे प्रसिद्ध असलेले दोन बिंदू एकमेकांबद्दल संपूर्ण अपरिचित होते. म्हणजे खंडोला रंजना माहीत नव्हती किंवा रंजना त्याला ओळखीत नव्हती असं नाही, तर रंजनाच्या सौन्दर्यानं खंडो कधी भुलला नाही तर खंडोच्या हुशारीपुढं ती कधी दिपली नाही. तिची सगळी 'कुळं' पैसेवाली होती आणि ह्या मेषपात्रांना ती बरोबर झुलवीत असे. त्यात तिचं काही चुकतंय असं मला कधीच वाटत नव्हतं. ही सगळी मुलं तिच्यापुढं गोंडा घोळीत होती. तिनं बोलावलं की 'जी सरकार' म्हणून हाजिर होत होती आणि ठोकरलं तर कपाळ बडवीत होती. पण झाल्या प्रकाराचा, तिच्या दोन मुस्कुटांत मारून जाब विचारणारा कोणी नव्हता आणि त्यामुळंच सौन्दर्याबद्दल तिला फाजील अभिमान होता. कुठल्याही मुलाला आपण 'व्हिक्टिम' बनवू असा तिचा पक्का ग्रह होता.

रंजनाच्या आणि आमच्या घरचीच ओळख असल्यानं मी आणि ती नेहमीच नसलो तरी प्रसंगी बोलत असू. तिचा स्वभाव खूप मोकळा होता. तिनंच मला ही बातमी सांगितली.

"तू हे आव्हान स्वीकारायला नको होतंस, रंजना." मी शांतपणं तिचं बोलणं ऐकल्यावर म्हणालो.

"का ?"

"अगं, त्या एकमार्गी मुलाच्या जीवनात वादळ उठवून काय साधणार आहेस, तू ?"

"तेच मी मैत्रिणींना सांगितलं रे !"

"मग काय म्हणतात त्या ?"

" त्या म्हणतात की म्हणे माझ्या रूपाला तो मुळीच भुलणार नाही. "
" तू काय म्हणालीस ?"
" मी त्यांना विश्वामित्राचं उदाहरण दिलं. "
" मग ?"
" त्यांनी पैज लावली. "
" तू ती स्वीकारलीस !"
" अर्थात ! माझ्या प्रेस्टीजचा प्रश्न होता तो. "
" पण त्याच्या कदाचित् जीवनाचा प्रश्न होईल तो !"
" हं !"
" तू परत विचार करावास. "
" माझा विचार पक्का आहे. " ती निश्चयानं म्हणाली. खरं म्हणजे ह्या लढतीचं आकर्षण मलासुद्धा होतं. रंजनानं प्रतिज्ञा केली होती की एका महिन्याच्या आत ती खंडोला आपल्या भजनी लावणार होती. दोन्ही बाजू आपापल्या परीनं बळकट होत्या. रंजनाचा ह्या बाबतीत नक्कीच पराभव होणार असंच मला वाटत होतं. कारण खंडोचं चार वर्षांतील चारित्र्य स्वच्छ होतं. मुलींबाबत तो उदासीनपणं वागत असे. त्यामुळं रंजनाच लागली तर त्याच्या भजनी लागेल.

खंडो बल्लाळच्या दुर्दैवानं आणि रंजनाच्या सुदैवानं तो दिवस उगवला. सकाळीच वृत्तपत्रांत, खंडो बल्लाळच्या एका कथेला बक्षीस मिळाल्याची बातमी आम्ही वाचली. खंडोला शंभर रुपयांचं पहिलं पारितोषिक मिळालं होतं. वर्गात शिरल्याबरोबर आम्ही सर्वांनी त्याचं हार्दिक अभिनंदन केलं. त्यानंही ते स्वीकारलं. रंजनानं मात्र फारसं लक्ष दिलं नाही. खंडोचं अभिनंदन करण्यात जशी मुलं होती तशा मुलीही होत्या आणि त्या रंजनाच्या खास वर्तुळातल्या होत्या. तरी रंजनानं त्याचं अभिनंदन केलं नाही. तास संपले. आम्ही बाहेर पडलो. खंडो बाहेर पडला. रंजनाही बाहेर पडली. मी मुद्दाम मागेच रेंगाळलो. माझा अंदाज होताच, की रंजना ही संधी दवडणार नाही. महाविद्यालयाच्या सज्जात तिनं खंडोला थांबवलं.

" Hearty Congratulations मि. बल्लाळ !"
" आभार ! "
रंजनाचे गोड आवाजातले शब्द, त्यांतलं माधुर्य, खंडोच्या रुक्ष आभार, नुसत्या 'आभार'—शब्दापुढे तापलेल्या तव्यावरचा पाण्याचा थेंब हवेत विरावा तसे विरले. काय बोलावं हे क्षणभर तिला कळेना. काही तरी बोलायचं म्हणून ती परत गुळमट आवाजात म्हणाली,
" अं ! आपण चहा घेऊन या ? चला ना ! "
" माफ करा ! मी उपाहारगृहात जात नाही. "

" इश्श ऽऽ ! चला की ऽऽ माझ्याकरता ! "

" क्षमा करा, मुलींबरोबर 'अशा ठिकाणी' जाणं मला प्रशस्त वाटत नाही." खंडो परत रुक्षपणे म्हणाला.

रंजनाचा सगळा उत्साह मावळला. ह्या मुलापुढे काय बोलावं ?

ती गप्प उभी असलेली पाहून खंडोनंच एकदम विचारलं,

" मी निघू का ? "

" अं ! हो ! हो ! पण माझं एक ऐकाल ? "

" ? "

" आज आमच्या घरी याना, संध्याकाळी. "

" जमेलसं दिसत नाही. "

" सकाळी मी न्यूज वाचली तेव्हाच डॅडींना तुमच्याविषयी सांगितलं. मग तेच म्हणाले बोलाव त्यांना संध्याकाळी म्हणून. मग येणार ना ? Please for sake of my Dady."

" मी शक्यतोवर प्रयत्न करीन. " खंडोनं आश्वासन दिलं.

त्यांची पहिली मुलाकात अशी झाली. खंडो अर्थात तिच्या घरी गेला नाहीच, पण दोन दिवस वर्गातही आला नाही. रंजनाचा चेहरा पडत होता. तिचं उसनं अवसान मला समजत होतं. दोन दिवसांनी खंडो आला तसा रंजनाचा हुरूप वाढला. ती त्याच्याशी लाडे लाडे बोलू लागली. त्याची टिपणं घेऊ लागली. त्याच्याबरोबर महाविद्यालयात येऊ जाऊ लागली. पण खंडो मात्र होता तसाच होता. रंजनामुळे त्याच्या वागण्यात, राहण्यात किंवा बोलण्यात काही फरक पडलाय असं दिसत नव्हतं.

घर ते महाविद्यालय आणि तिथून वाचनालय किंवा घर हा त्याचा क्रम तसाच होता. रंजना मात्र बदलत होती. बहुधा रंजनाच खंडोच्या भजनी लागणार असं मला वाटू लागलं. ती नेहमी त्याच्याबरोबर राहण्याचा प्रयत्न करीत असे. त्याला आवडेल असं वागत असे.

जवळजवळ महिन्यानंतर तिचा मला निरोप आला. आज संध्याकाळी साडे-सहा सातच्या सुमारास नगरपालिकेच्या बागेच्या प्रवेशद्वारापाशी, डाव्या हाताला असलेला लताकुंज बघून जा. ह्याचा नीटसा अर्थ मला कळला नाही. तरीसुद्धा त्याच वेळेला, तोच लताकुंज पाहण्यासाठी मी बागेत गेलो. तो विशिष्ट कुंज बघितला. माझा डोळयांवर विश्वासच बसेना. कुंजाशेजारीच रंजना आणि खंडो एकमेकांना खेटून बसले होते. रंजनानं मला बघितलं तशी तिनं रुमाल हलकेच हलवला आणि हसली. खंडोविषयी मला उगीच सहानुभूती वाटू लागली. तरीसुद्धा खंडो तिच्या कच्छपी लागेल हे मन मान्य करीना. कदाचित खंडोनंच तिला इथं बोलावलं असेल. नाही तरी तिच्या वागण्यात खूपसा बदल झाला होताच.

पण माझी शंका खोटी ठरली. रंजना मला आणि तिच्या मैत्रिणींना स्थळं आणि वेळ सांगत असे आणि मला किंवा तिच्या मैत्रिणींना त्यांची म्हणजे रंजना-खंडोची जोडगोळी पाहावयास मिळे. एकदा मी त्यांना हातात हात गुंफून चित्रपटगृहाबाहेर पडताना पाहिलं. खंडोचा वेश अगदी साहेबी होता. त्यानं तपकिरी रंगाचा गरम कापडाचा सूट घातला होता. तो खंडो मला कसासाच वाटला. नंतर नाटयगृहातून, एकच शाल लपेटून, दोघांना बाहेर पडताना मी पाहिलं आणि नंतर पुष्कळ वेळा एकत्र पाहिलं. मला कळलं की खंडो हरत होता, स्वतःच्या नकळत. रंजना जिंकत होती. मेनकेच्या मदनमस्त सौंदर्यात ' विश्वामित्र ' चळत होता.

मी ओळखलं, रंजनाच्या मैत्रिणींना समजलं. रंजनाच्या लक्षात आलं की खंडो तिला वश झाला. तिचा विजय होता. आम्ही हार कबूल केली. त्यानं तिला दिलेल्या प्रेमचिठ्या तिनं आमच्यासमोर फाडल्या. आता फक्त शेवटी समारोपाचं काम होतं. रंजनानं खंडोला दूर करायचं. तो इतरांसारखाच एक होता, हे त्याला दाखवायचं आणि खंडोनं मग हात चोळीत बसायचं किंवा भावनेच्या आहारी जाऊन महाविद्यालयच सोडायचं.

हे सर्व सरळ होतं. हे घडणार असं मला नक्की वाटत होतं. खंडोविषयी मला अपार अनुकंपा वाटत होती.

पण विधिलिखित तसं नव्हतं.

खंडोचं आणि रंजनाचं एकदा वर्गातच वाजलं.

तास संपला होता. मी उगाच सज्जात रेंगाळत होतो. खंडो आणि रंजना वर्गात बोलत होते. हळूहळू आवाज वाढला. मी आत गेलो. खंडो तावातावाने बोलत होता.

" माझी सगळी तत्त्वं मी झुगारली. नाटक–सिनेमा म्हणशील तिथे आलो आणि आज माझ्याबरोबर येत नाहीस ? "

" Sorry बल्लाळ, आज मला वेळ नाही. "

" कुठ जाणार आहेस ? "

" त्याच्याशी तुला काय करायचंय ? "

" म्हणजे ? "

" समज, की मला तुझ्याबरोबर यायचं नाही. "

" का ? "

" मी पिक्चरला जातेय. मोहन शहाबरोबर ! "

" अस्सं ! "

" हो ! आणि आपले संबंध इथेच संपावेत असं मला वाटतं ! "

रंजना निघून गेली त्या दिशेने तो किती तरी वेळ पाहत होता. त्याचं बोलणं पुष्कळांनी ऐकलं होतं. खंडोच्या धुतल्या चारित्र्यावर आजचा डाग उठून दिसत होता. त्याचं वेगळेपण लोपलं होतं. खंडो बाहेर निघून गेला.

दुसऱ्या दिवशी खंडो आला नाही.

तिसऱ्या दिवशीही तो आला नाही.

तब्बल पंधरा दिवस तो आला नाही.

पंधरा दिवसांनी तो आला. निमूटपणे तासांना बसला. तास संपले. सगळे बाहेर पडले. रंजना जरा वेळ थांबली. तोही उगाचच रेंगाळला. मग रंजना आणि मोहन शहा जोडीनं बाहेर पडले. खंडो त्यांच्यामागून बाहेर पडला. महाविद्यालयासमोर त्यानं रंजनला जरा थांबवलं. मोहन शहाला जोरानं बाजूला ढकललं. त्याचं वागणं रंजनाच्या बहुधा लक्षात आलं असावं. ती पळू लागली. खंडोनं तिचा वाऱ्यावर उडणारा पदर पकडून हिसकला. त्यासरशी तिचं पातळ सुटलं. एका बॅरिस्टरची पोर महाविद्यालयासमोरच्या भर रस्त्यात फक्त परकर-पोलक्यात उभी होती. खंडो पुढे गेला. त्यानं खिशातनं एक मोठा चाकू बाहेर काढला. आम्ही जोरात रस्त्याच्या दिशेनं धावलो पण तोवर रंजनानं एक आर्त किंकाळी फोडली होती. तिचा निष्प्राण देह रक्ताच्या थारोळ्यात रस्त्यावर पडला होता. खंडो त्यानंतर जो नाहीसा झाला तो आजतागायत कुणाला भेटला नाही. कदाचित् त्यानं जीव दिला असावा. कदाचित् नसेलही. पण पोलिसांना मात्र तो सापडला नाही.

नाना थांबले.

आम्ही तंद्रीतून जागे झालो.

नानांचे ओठ थरथरत होते. त्यांच्या डोळ्यांत पाणी साचलं होतं. कुणासाठी होतं ते ? रंजनासाठी की बल्लाळसाठी ?

“ Horrible ! ” टिपू म्हणाला.

“ Terrible ! ” छोटू उद्गारला.

“ भयंकर. अती भयंकर ! ” मी म्हणालो.

नाना तसेच बसून राहिले. आम्ही खुणेनंच त्यांना जातो म्हणून सांगितलं आणि घराबाहेर पडलो. ○


**नं. ४२ मध्ये रु. २१,००० जिंकले**

श्री. एन्. के. वलरामन, कालिकट नर्सरी, **कालिकट – २**

लिट्क्विझ नं. ४४ मध्ये **रु. ५०,०००** जिंका.

- **वार्षिक वर्गणीदार स्पर्धा**
- **मिनिक्विझ–बी मध्ये चांदीचा ग्लास.**

प्रवेश-पत्रिका प्रत्येक रविवारच्या नवशक्तीत प्रसिद्ध होते.

१५ भाषेंत १५० एजन्टस् २४५ पत्रांत जाहिरात

# भिंतीच्या पैबंड्या

सुधाकर वाजे

## ☐ राण्यांचे ट्रेड युनियन

हल्लीचे दिवस फारच कठीण दिसतात. मागे युरोपातल्या कुठल्या तरी देशाच्या राणीने हल्लीच्या महागाईच्या दिवसांत आपला तनखा पुरत नाही, सबब महागाई-भत्ता वाढवावा, अशी स्वतःच्या सरकारकडे मागणी केल्याचे मला अजून स्मरते. आता तीच हलाखीची पाळी गरीब बिचाऱ्या इंग्लंडच्या राणीवरही आलेली दिसते. कारण नुकतेच वर्तमानपत्रांत वाचले की, इंग्लंडमधील चलनवाढीमुळे राणी एलिझाबेथला सरकारतर्फे मिळणारा भत्ता आता पुरत नसल्याने तो वाढविण्याची तिने आपले पंतप्रधान विल्सन यांच्याकडे मागणी करावी, असा तिच्या आर्थिक सल्लागारांनी तिला सल्ला दिला आहे. माय गॉड ! एकामागून एक राण्यांच्यावरही असले कठीण दिवस यायला लागले तर हल्लीच्या लोकशाही दारिद्र्याच्या दिवसांत ' राजेशाही ' सुखाला राण्यादेखील मुकू लागल्या, असा त्याचा गंभीर अर्थ होणार.

या प्रसंगातून निभावण्याचा मला तरी एकच मार्ग दिसतो. व तो म्हणजे तमाम राण्यांनी एक ट्रेड युनियन स्थापन करावी आणि आपली चणचणीची परिस्थिती सुधारण्यासाठी एकजुटीने लढा द्यावा. अर्थात लढा म्हटला की घोषणा-पत्र आलेच तेव्हा सदरहू राणी-युनियननेही आपल्या मागण्या थेट मार्क्सच्या मॅनिफेस्टोच्य थाटात बुलंद कराव्यात. आता राजे-राण्यांशी अस्मादिकांचा संबंध अक्षरशः नावापुरताच आलेला असल्याने राण्यांनी काय मागण्या कराव्यात, याची कल्पना करणे तितकेसे सोपे नाही. तरीदेखील ढोबळ अंदाज बांधायला हरकत नाही.

१. सर्व राण्या समान व समदुःखी आहेत. तेव्हा इंग्लंडची राणी तर हिंदुस्थानातली महाराणी असा भेदभाव नष्ट झाला पाहिजे.

२. इंग्रजीत किंग कॅन् डू नो राँग किंवा संस्कृतात राजा कालस्य कारणम् अशा म्हणी आहेत. त्यावरून स्पष्ट होते की, राजेलोकांनी स्वतःला अवास्तव महत्त्व दिल्यामुळेच राण्यांना पडतीचा काळ आला आहे. सबब राजाची बायको ती राणी असा जुना-पुराणा हिशेब सोडून देऊन राणीचा नवरा असूनही तो राजा असेलच असे नाही. हा इंग्लंडचा खाक्या सर्वत्र स्वीकारण्यात यावा.

३. पहिल्या एलिझाबेथ राणीजवळ म्हणे इतके झगे होते की, ती एक झगा फक्त एकदाच घालीत असे. त्या काळाशी तुलना करता दुसऱ्या एलिझाबेथची व तिच्या समकालीन राणी-वर्गाची परिस्थिती खूपच खालावलेली आहे. तेव्हा हल्लीच्या

राण्यांनी एकमेकींचे जुने कपडे वापरून प्रसंग साजरा करावा.

४. लोकांना दर्शन देण्याच्या कष्टदायक कामासाठी राण्यांना अतोनात राबविण्यात येते. तेव्हा या कामासाठी करावी लागणारी जिवापाड मेहनत लक्षात घेऊन इतर कामाचे तास ठरवितात त्याप्रमाणे प्रस्तुत कामाची मिनिटे ठरवून द्यावीत.

५. प्रत्येक राणीला तिच्या राज्याचा (किंवा खालसा संस्थानाचा) विस्तार पाहून ग्रेड आणि मासिक भत्तावाढ ठरवून द्यावी. त्या ग्रेडमध्ये एफिशियन्सी बार नसावा, कारण राज्य करायला एफिशियन्सी लागत नाही हे हिंदुस्थानने सिद्ध करून दाखविले आहे.

## ☐ कानउघाडणी करणारे यंत्र

पॅरिसमध्ये नुकतेच ऑफिस कामासाठी लागणाऱ्या यंत्र-सामग्रीचे एक प्रदर्शन भरले होते, तेथे एका बाईने चौकशी केली—"नवरा घरी नसताना चेकवर त्याची सही करू शकेल असे एखादे यंत्र आहे का?" आता बोला! आधुनिक गृहिणींचा संसार आईच्या कुकरी-बुकवर अन् नवऱ्याच्या चेकबुकावर चालतो अशी इंग्रजीत एक म्हण आहे खरी, पण ती इतकी 'ॲटोमॅटिक' खरी करून दाखविण्याचा एखादी बाई चंग बांधील याची कल्पना नव्हती. आता तसाच विचार केला तर आधुनिक गृहिणीच्या सुखसोयींसाठी इतरही अशीच यंत्रे निघायला हरकत नाही. उदाहरणार्थ, नवऱ्याचे खिसे त्याच्या नकळत तपासणारे यंत्र, तो लग्नाचा वाढदिवस विसरला तर तो प्रकट करण्यासाठी ऑटोमॅटिक डिश-वॉशरच्या धर्तीवर ऑटोमॅटिक डिश-ब्रेकर, बायकोने "अहो, मी काय म्हणते," अशी सुरुवात करून आख्यान लावले की ऐकले न ऐकले करण्याची नवऱ्यांना वाईट खोड असते, तेव्हा अशा वेळी त्याची अक्षरश: कानउघाडणी करू शकणारे यंत्र, नवरा आपल्या फटाकड्या स्टेनोबरोबर हॉटेलात जाऊ लागला तर त्याचे पाय मागे ओढणारे रीमोट-कंट्रोल यंत्र, इत्यादी उपकरणे उपलब्ध झाली तर कुठलीही गृहिणी बटणे दाबून सुखाचा संसार करील.

## ☐ पोपटपंचीचे ट्रेनिंग

ब्रिटनमधील विरोधी पक्षाचे नेते एडवर्ड हीथ यांचे नाव असलेल्या एका पोपटाने बोलणाऱ्या पोपटाच्या स्पर्धेत पहिले बक्षीस पटकावल्याची बातमी आहे. आता यात नवल ते काय? कुठलाही पोपट आपली पोपटपंची राजकारणी मंडळीपासून शिकत असणार हे काय सांगायला हवे? प्रस्तुत पोपटाला एका राजकीय नेत्याचे नाव दिल्याबरोबर त्याने बडबड करण्यात नाव काढले यात मुळीच आश्चर्य नाही. मात्र या पोपटाने दिग्विजय करण्यासाठी हिंदुस्थानला येण्याचे धाडस करू नये. आमच्याकडचा एखादा मच्छरदेखील त्याला व्याख्यानबाजीत हरवू शकेल.

## ☐ मनी मावशीचे ब्लड प्रेशर

टोकियोमध्ये हल्ली उंदरांचा सुळसुळाट फार का झाला आहे याचा एका जपानी डॉक्टरने नुकताच तपास केला तेव्हा त्याला म्हणे आढळून आले की, टोकियोतील मांजरे आयते व चांगले चांगले खाऊन इतकी माजली आहेत की त्यांना धावताना दम लागतो, त्यांना डायबेटिस झाला आहे अन् त्यांचे ब्लडप्रेशरही वाढले आहे, त्यामुळे ती उंदीर पकडू शकत नाहीत. आता बोला! चरबी आणि ब्लडप्रेशर वाढणे ही श्रीमंत माणसांची दुखणी श्रीमंत मांजरांनाही लागायला लागली तर अशा मांजरांच्या गळयात घंटा बांधण्यासाठी उंदरांची ऑलिंपिक शर्यतच लागायची. आणि जपानी मांजरे जर इतकी सुखवस्तू झाली आहेत तर कुत्रेदेखील असेच खुशालचेंडू झाले असले तर नवल नाही. या कुत्र्यांना भुंकून खोकला होऊ नये म्हणून लाऊडस्पीकर लागत असेल, अन् शेपटी हलविण्याचे शारीरिक श्रम सहन होत नसल्यामुळे ऑटोमॅटिक लांगूलचालक बसविण्यात आला असेल. पण जपान कितीही संपन्न असला तरी पौर्वात्य देश आहे, मग श्रीमंत पश्चिमात्य देशांत काय अवस्था असेल ? इंग्लंडमधल्या मेंढया थंडी वाजू नये म्हणून फरकोट घालीत असतील, जर्मन घोडयांना धावताना दम लागू नये म्हणून त्यांना हॉर्सपावर इंजिन लावण्यात आले असेल, तर अमेरिकन गाईंची वासरे मिल्कमेड छाप कन्डेन्स्ड दूध पीत असतील. पण या सर्व गोंधळांत एक महत्त्वाची गोष्ट राहिलीच. टोकियोतली मांजरे निरुद्योगी श्रीमंतीत लोळायला लागली तर उंदीर थोडेच खोबऱ्याच्या तुकडयासाठी लपतछपत वणवण करणार आहेत ? माझी तर खात्री आहे की ते आता रोज मोदक झोडून वामकुक्षी करीत असावेत.

## ☐ कागदी कारुण्य

युरोपातल्या कुठल्याशा शहरात म्हणे करुण चित्रपट पाहताना स्त्रिया इतक्या रडतात की तेथल्या एका सिनेमावाल्याने स्त्री-प्रेक्षकांना कागदाचे रुमाल मोफत वाटण्याची सोय केली आहे. कल्पना उपयुक्त आहे, पण ती आपल्याकडे कितपत वापरता येईल ? हिंदी सिनेमातली नायिका करुण प्रसंगी रडायच्या ऐवजी गात सुटते तेव्हा प्रेक्षकांना हसावे की रडावे—नव्हे, रडावे की हसावे—असा प्रश्न पडतो. शिवाय आधी कितीही रडारड झाली तरी शेवटी शुभमंगल झालेच पाहिजे असा हिंदी सिनेमाचा कडक कायदा आहे. तेव्हा माझ्या मते आपल्या चित्रपटगृहात रुमाल वाटण्याच्या ऐवजी अक्षता वाटण्याची सोय अधिक उपयोगी ठरेल. आणि रुमालच मिळणार असतील तर कॅलिकोचे का नकोत ?

○



# ।।।।।एक कलि

**अनिल हवालदार**

कळायला लागल्याच्या वयापासून पहिल्या प्रेमाची चाहूल लागेपर्यंतच्या काळात सारं आयुष्य शाळेच्या वसतिगृहात गेलेलं. आई लहानपणीच देवाघरी गेल्यानं तिच्या मायेची ऊब नाही, तर बाप तिरसट–माणूसघाणा असल्यानं त्याच्या प्रेमाची पाखर नाही. अशा या दुर्दैवी मुलीला वसतिगृहातल्या कडक शिस्तीत आणखीनच गुदमरल्यासारखं होतं. या मुलीच्या मैत्रिणींना त्यांच्या घरून पत्रं येतात, सुटीत त्या आपापल्या घरी जातात; पण ही मुलगी मात्र एकटीच राहते. तिच्या बापाला तिची सावलीसुद्धा पाहायची इच्छा नाही. तो तिच्यासाठी लागतील तेवढे पैसे पाठवतो. पण तिला हवंय त्याचं प्रेम! नेमकं तेच तिला मिळत नाही आणि एक तरुण डॉक्टर तिच्या जीवनात प्रवेश करतो. त्याच्या प्रेमाचा ओलावा मिळताच ती त्याच्याकडे आकर्षित होते. पण वसतिगृहातील कडक स्वभावाची मेट्रन या प्रेमी युगुलाच्या गाठीभेटी बंद करते. सुटीचे दिवस येतात आणि एकलेपण असह्य होऊन ही मुलगी बापाची आज्ञा धाब्यावर बसवून तडक त्याला भेटायला जाते. आपल्या

घराचा कबजा घेते आणि प्रेमाच्या वर्षावाने पत्थरासारख्या बनलेल्या आपल्या बापाला परत माणसात आणते.

अशी ही जिद्दी मुलगी रजतपटावर साकार केली आहे मीराने. विख्यात निर्माते–दिग्दर्शक श्री. वसंतराव जोगळेकर आणि अभिनेत्री सुमती गुप्ते या कलावंत दांपत्याच्या कन्येने. आईची कथा, वडिलांचे दिग्दर्शन, अशोककुमारसारखी मातबर, कलावंत मंडळी आणि शिवाय रंगीत चित्रपट, अशा हेवा वाटणाऱ्या परिस्थितीत मीराने चित्रसृष्टीत पहिले पाऊल टाकले.

पण चित्रसृष्टीत सरळ कधी घडलंय ? मुहूर्तापासून चित्रपट पुरा व्हायला तब्बल तीन–चार वर्षांचा काळ गेला. अड्चणी अनंत होत्या. पण ह्या मधल्या काळानं एक वेगळी मीरा घडली. शाळा–मैत्रिणी, प्रेमळ आई-बाप, भावंडं ह्या वातावरणात हसत-खेळत जीवन जगणारी मीरा हळूहळू अंतर्मुख बनली. तारुण्याच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवीत असतानाच तिने रजतसृष्टीत प्रवेश केला. उत्साह होता–जिद्द होती. इतर अनेक मुलींना चित्रसृष्टीत पदार्पण करताना जे भले-बुरे अनुभव येतात, त्यांची मीराला भीती नव्हती. आई-वडील त्याच क्षेत्रातील असल्यामुळे सारे सुरक्षित होते. पण कामच नव्हते. महिन्यातून जेमतेम दोन दिवस शूटिंग. तेवढे दिवस भरभर जायचे. मग पुन्हा एक पोकळी. जीवघेणी पोकळी ! कशात म्हणून लक्ष लागायचे नाही. फोटोग्राफीचा कोर्स पुरा केला. पण त्यात मन रमेना. कॉलेजमध्ये नाव घातलं. पण ऐन अभ्यासाच्या वेळी शूटिंग ! आयुष्याला कसलाच नीट आकार नाही. आपण

कोण आहोत, हा प्रश्न मनाला वारंवार पडायचा. साध्यासाध्या गोष्टींत चिड-चिडल्यासारखं व्हायचं. कलावंत म्हणून आपलं भवितव्य काय घडेल, या धास्तीनं रात्ररात्र झोप उडायची.

पण शूटिंग आलं की, हा सारा गोंधळ शांत व्हायचा. मग तिथल्या वातावरणाची सुख-दुःखं सुरू व्हायची. कधी काम चांगलं व्हायचं तर कधी सगळा मूड बिघडून जायचा. मनात एक कल्पना धरून काम करावं आणि नंतर रशेस् पाहिल्या की, काहीतरी वेगळंच उमटलंय, हे लक्षात यावं. आऊटडोअर शूटिंगला गेल्यावर ओळीनं वीस-वीस दिवस तोंडाला रंग थापून बसावं आणि इतर कलावंतांच्या डेटस् मिळणार नाहीत, म्हणून दिग्दर्शक–पिताजींनी त्यांचंच शूटिंग घ्यावं. कारण हिरॉईन घरचीच ना !

हे असं घडलं ते चांगलंच झालं, असं आज मात्र मीरा म्हणते. तिच्यापाशी अजिबात नसलेला पेशन्स तिला या काळात शिकावा लागला आणि चित्रपटात अभिनय करणाऱ्या कलावंताला प्रामुख्याने पेशन्स असावा लागतो. मीराचा 'फेव्हरिट' कलाकार असा कुणी नाही. त्या त्या भूमिकेत तो तो कलाकार तिला आवडतो. म्हणजे तिला कलावंतांच्या भूमिका आवडतात. आवडलेली भूमिका आपण कशी केली असती, अशी नकळत मनात तुलना सुरू होते. पण अमुक एक 'आदर्श' धरून काम करावं, असं मात्र तिला वाटत नाही. तिला आदर वाटतो, पण आंधळी भक्ती करायचा मात्र तिटकारा आहे. सद्‌गुणी माणसावर लोक प्रेम करतातच, पण एखाद्या व्यक्तीचे दुर्गुण माहीत असूनही तिच्यावर प्रेम करता आलं पाहिजे. खरं प्रेम त्यालाच म्हणतात, अशी मीराची धारणा आहे.

मीरा म्हणजे अनेक विरोधी गोष्टींचं एकत्र मिश्रण. एकीकडे कठोर वास्तव-वादाच्या गोष्टी करीत असतानाच पाहता पाहता ती स्वप्नसृष्टीत शिरते. पुन्हा स्वप्नाळू नसल्याचा दावाही करते. तिचा स्वप्नातला राजपुत्र खूप काम करणारा आहे. त्याला आपल्या कामापुढे आपल्या बायकोचीही–म्हणजे तिची–फिकीर वाटत नाही. या राजपुत्राचा व्यवसाय काय असावा, हे बंधन नाही. पण त्यात तो मोठा व्हावा–यशस्वी व्हावा, असं तिला वाटतं. संसारात स्त्रीचं स्थान दुय्यम आहे; तेव्हा पुढं-मागं हा राजपुत्र खरोखरीच अवतरला आणि त्यानं 'मीरा-स्वयंवर' जिंकलं तर त्याच्या मर्जीवरच 'कलावंत-मीरा'चं आयुष्य पुढं चालेल अथवा थांबेल. आपल्या अत्यंत आवडत्या व्यक्तीला नाराज करून कला-आराधना करणं तिला बिल-कुल आवडत नाही.


आज या घटकेला मात्र या राजपुत्राचा विचार खूप दूर आहे. आज मीरा वाट पाहते आहे आपल्या कलावंत–कारकीर्दीची. अभिनयाची अगदी लहानपणापासून आवड होती, असली खोटी खोटी मुलाखत ती देत नाही. शालेय शिक्षण संपल्यावर तिला हा मार्ग पत्करावासा वाटला. तिनं आपली इच्छा वडिलांना बोलून दाखवली.

वडील तिला म्हणाले की, निदान पदवीपर्यंत तरी शीक. मीराचा त्याला ठाम नकार. मग फिल्मालयच्या अभिनय-शाळेत सात–आठ महिने शिक्षण आणि एक दिवस 'एक कली मुस्काई 'च्या नायिकेच्या भूमिकेसाठी निवड. एवढी वाटचाल केल्यानंतर मीरा आता वाट पाहते आहे–नव्या नव्या, चांगल्या भूमिकांची. तिची या चित्रपटातील भूमिका तिनं मन लावून वठविली आहे. ती कशी झाली हे लोकांनी ठरवायचं.

फिल्मालयच्या अभिनयशाळेतील शिक्षणाचा तिला खूप फायदा झाला. कॅमेऱ्यासमोर काम करताना समोरचे दिग्दर्शक वसंतराव जोगळेकर हे आपले वडील आहेत, ही भावना विसरता येत नाही, ही तिची प्रांजल कबुली. प्रणयप्रसंग वठवायला तिला संकोच वाटला. कॅमेऱ्याच्या बंदोबस्तात वावरताना अनेक वेळा त्रास झाला. पण त्या त्रासातही एक सुख होतं.

पण पडद्यावरची मीरा आणि गेल्या तीन वर्षांत 'मॅच्युअर' झालेली मीरा यांच्यामध्ये आणखीही एक मीरा आहे. या मीराच्या तुफानी भाव-भावना तिच्या वयाला साजेशा आहेत. तिला तिच्या घरच्या शांत-समाधानी आयुष्याचा कंटाळा आहे. काहीतरी 'थ्रिलिंग' घडावं, असं तिला वाटतं. चाललंय ते आयुष्य अगदी आळणी आहे–त्यात काही दम नाही–सगळ्या गोष्टी एकदम बोअरिंग ! म्हणूनच काहीतरी 'थ्रिलिंग' करून दाखवण्यासाठी पूर्ण विचार करून तिने या व्यवसायात पदार्पण केले आहे. अर्थात 'एक कली 'च्या यशापयशावरच तिची या व्यवसायातील भावी वाटचाल ठरणार आहे !

○




**एकूण काय, बायको-मेव्हणी, लवंगी–मिरचीच्या धूमधडाक्यात तुकारामालाही प्रेक्षक मिळतो !**

# तुका म्हणे मी वेगळा

आनंद संगीत मंडळी या नाट्य-संस्थेची स्वतःची अशी परंपरा आहे; तसेच स्वतःचा असा प्रेक्षकवर्गही आहे. आपली परंपरा आणि प्रेक्षक या दोघांना जोपासत कंपनीने आपली ४३ वर्षांची वाटचाल पूर्ण केली आहे. मासिक वेतनावर कलावंतांना काम देणारी ही एकमेव नाट्यसंस्था आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. स्वाभाविकपणेच नाट्यनिर्मितीसाठी नवे नाटक उचलताना संस्थेचे सूत्रधार श्री. नानासाहेब शिरगोपीकर यांच्या डोळ्यांसमोर आर्थिक बाजू प्रामुख्याने असणे स्वाभाविक आहे. ' भाव तोचि देव ' या त्यांच्या नाटकाने अमाप यश मिळविले. त्या नंतर प्रामुख्याने विद्यार्थ्यांसाठी लिहिलेल्या ' परीक्षेआधीच्या सात रात्री 'चे संमिश्र कौतुक झाले. पण प्रयोगांची संख्या मर्यादित राहिली. म्हणन शिरगोपीकर पुन्हा त्यांच्या प्रेक्षकांसामोरे गेले आपले नवीन नाटक ' तुका म्हणे मी वेगळा ' हे घेऊन. अपेक्षेप्रमाणे दाद आली आणि पुण्या-मुंबईत प्रयोगांचे सत्र सुरू झाले आहे.

नामसंकीर्तनात दंग होऊन आपल्या रसाळ वाणीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या तुकारामांच्या कीर्तनाला भक्तगणांची अमाप गर्दी लोटत असते. कीर्तनाचा मक्ता पिढीजात पद्धतीने

१



अनंत वेर्णेकर (तुकाराम) आणि रसना (जिजाऊ)

आपल्याकडेच आहे, अशा समजुतीत वावरणारा सालो-मालो हा ' दशग्रंथी ब्राह्मण ' तुकारामाच्या यशाने नाराज होतो. तुकारामाने देहू सोडून जावे म्हणून नानापरीचे प्रयत्न करतो.

देहू गावचा भोळाभाबडा होयबा पाटील अजाणतेपणाने सालो-मालो-माधवच्या या दुष्कृत्यास हातभार लावतो, तर गावचा कुलकर्णी खंबीरपणाने तुकारामाच्या बाजूने उभा राहतो. सखाराम नावाच्या शेतकऱ्याचे शेत राखण्याची जबाबदारी तुकारामबुवा स्वीकारतात आणि बुवांची स्वारी नामसंकीर्तनात दंग असताना पाटील व सालो-माधवची जोडी उभे पीक जाळून टाकतात व बुवांच्या राहत्या घराचा कब्जा मिळवण्याचा प्रयत्न करतात. साक्षात् भगवान श्रीकृष्ण तुकाराम-बुवांच्या मदतीला धावून येतात आणि बुवांवरील संकट टळते.

तुकारामबुवांना ब्राह्मणांकडून वेद-कथनास होत असलेला प्रखर विरोध, शिवाजी महाराजांनी बुवांची घेतलेली भेट व त्यांना लिहिलेले पत्र, बुवांची गाथा इंद्रायणीत बुडवण्याचा झालेला प्रयत्न व भक्तिमार्गाने तुकारामांनी मिळवलेले यश आणि त्यांचे सदेह वैकुंठगमन, या बुवांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांची दखल बुवांच्या चौथ्या अंकातील लांबलचक निवेदनाद्वारे, तसेच चमत्कृतींचा (Tricks) वापर करून घेण्यात आली आहे.

बुवा भक्तिमार्गी, षड्रिपूंवर ताबा मिळवलेले, तर पत्नी जिजा (आवली) संसारसुखात रस घेणारी ! बुवांच्या पांडुरंगभक्तीचा तिला स्वाभाविक तिटकारा

आहे. तुकारामबुवांवर नाटक-सिनेमा करणाऱ्या मंडळींनी या विरोधाभासाचा पुरेपूर लाभ उठवला आहे. या नाटकाचे लेखक श्री. नानासाहेब शिरगोपीकर हेही त्याला अपवाद नाहीत. आपले नाटक उभे करण्यासाठी त्यांनी या विरोधाभासाचा पुरेपूर उपयोग केला आहे. बुवांच्या भक्तिमार्गावर नाराज असलेल्या जिजाऊला त्यांनी बुवांचा वेष देऊन तिच्या पद्धतीने विठ्ठलनामाचा गजर करावयास लावले आहे.

नाटक व चित्रपट या माध्यमांद्वारा तुकारामांबद्दल बहुतांनी बहुत प्रकारे सांगितले आहे. 'प्रभात'चा 'संत तुकाराम' तर कायमचा अजरामर होऊन गला आहे. नानासाहेबांचा हा अजून एक प्रयत्न. आपल्या या नाटकात त्यांनी बुवा व सालो-मालो यांच्यामधील संघर्षाला मध्यवर्ती स्थान दिले आहे आणि जिजाऊच्या उपऱ्या विठ्ठलप्रेमाची झालर त्याला जोडली आहे.

नाटक पाहावयास जाणाऱ्या प्रेक्षकाला तुकाराम काही नवीन नाही, तरी नानासाहेबांच्या प्रयोगाला प्रेक्षकांचा उदार आश्रय आहे, याचे मुख्य कारण असे की, अशा पद्धतीचे नाटक ज्या पद्धतीने सादर केले असता प्रेक्षकाला रुचेल, अगदी बरोबर त्याच पद्धतीचा अवलंब श्री. शिरगोपीकर करतात. भोळ्याभाबड्या प्रेक्षकाला रिझवणारे चमत्कार ते मोठ्या खुबीने दाखवतात. कलावंतांचा त्यांचा संच दुय्यम प्रतीचा असेल, परंतु भरपूर मेहनत घेऊन ते जो प्रयोग सादर करतात, तो त्यांच्या मर्यादेत प्रथमश्रेणीचा असतो. त्यांच्या नाटकाच्या यशाचे गमक हेच आहे.

आपल्या तुकारामातही त्यांनी अनेक चमत्कृतींचा वापर केला आहे. झांजा, एकतारी आपोआप वाजू लागणे, भरल्या शेताला आग लागणे, शेतावरून जाणारी, उडती पाखरे दाखवणे, पांडुरंगाच्या सर्वव्यापी स्वरूपाची जिजाला कल्पना देणे, या घटना शिरगोपीकर प्रत्यक्ष रंगभूमीवर दाखवतात. या तंत्रावर त्यांची पूर्ण हुकूमत आहे. अर्थात या सर्व बाबतींत ते शंभर टक्के यशस्वी होतात असे नव्हे, पण त्यांनी मिळवलेले यशही दुर्लक्षून चालणार नाही.

कलाकारांपैकी रसना, (जिजाऊ), होयबा पाटील (शिरगोपीकर), अनंतराव वेर्णेकर (तुकाराम), कुलकर्णी (अभ्यंकर), लक्ष्मी (अक्कू बोरगावकर) आणि सालो-मालो (हंसराज कोरडे) हे सर्वच प्रमुख कलावंत मन लावून काम करतात आणि अशा स्वरूपाच्या नाटकाला अपेक्षित असे यश मिळवून देतात.

ज्या प्रेक्षकांसाठी या प्रयोगाची निर्मिती आहे, त्या पातळीवरून शिरगोपीकरांच्या या नवीन प्रयोगाकडे पाहिले तर त्यांचे कौतुकच करावे लागेल. मात्र या मर्यादेतही संगीताची बाजू तोकडी पडते याचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. खुद्द बुवांचे अभंगही अपेक्षेइतपत रंगू शकत नाहीत.

बायको-मेव्हणी, व्हटाचं डाळींब फुटलं, लवंगी-मिरच्या, या नाटकांच्या (?) धुमधडाक्यात तुकारामालाही प्रेक्षक मिळतो, याचे समाधान मिळाल्याशिवाय राहत नाही. ◻

—माणूस प्रतिनिधी

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी
सायनाचार्य

जानेवारी
१९६९ चे
राशि भविष्य

**मेष** : नव्या योजनांची स्फूर्ती घेऊन नवीन वर्षात पदार्पण करणार आहात. आजवर शनी-मंगळांनी खूप विरोध करून पाहिला, आता तेच सहकार्याचा हात पुढे करू लागतील.

आपल्या सर्वच अपेक्षा सफल होतील असे नव्हे. पण अपयशाचा डाग तुमच्या चारित्र्याला मुळीच लागणार नाही.

सूर्य भाग्यातून संचारत आहे. तोच तुमच्या योजनांना गती देऊ लागेल. या महिन्यात नवे व्यवसायक्षेत्र हाती येईल, बदली होण्याची लक्षणे दिसू लागतील. तीव्र विरोधातूनही नेत्रदीपक यश मिळवून दाखवाल.

दि. ५ ते ८, १६ ते २२, २९ ते ३० आपल्या अपेक्षा बऱ्याच प्रमाणांत सफल व्हाव्यात.

**वृषभ** : आपणांस प्रगतीच्या नव्या वाटा दाखवणारे हे आगामी वर्ष आपणांस चिरंतन स्मृतीचे ठरावे. पंचमस्थ गुरूचे सामर्थ्य या महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून आपल्या प्रत्ययास यायला लागेल. गुरू पंचमात, सूर्य भाग्यात. अशी ग्रहस्थिती क्वचित लाभते. म्हणूनच ती व्यावसायिक विक्रम करू शकते. पहिल्या पंधरवड्यात फक्त योजना आखल्या जातील आणि दुसऱ्या पंधरवड्यात त्या आकर्षक आकार घेऊ लागतील.

थोरांच्या सहकार्याने नवा धंदा उभारू शकाल, स्थावर. वाहन यांसंबंधीच्या विवंचना बऱ्याच प्रमाणात मिटवू शकाल.

कित्येकांना परराष्ट्रीय प्रवास घडतील तर कित्यकांच्या जीवनात दीर्घकालीन चिरस्थायी प्रगत घटना घडू लागतील.

दि. १२ ते १८, २२ ते २७, २९ ते ३१ सर्वोत्तम प्रगतीचा काल हाच.

**मिथुन** : कित्येक दिवसांपासून गुरूमंगळांची सहानुभूती आपण गमावून बसला आहात, आता ती परत मिळवणे अशक्य नाही. पण सहजशक्यही नाही. 'अशुभस्य कालहरणं' या नियमाला अनुसरून काही काल आपणांस वाट पाहणे आवश्यक आहे.

आपले पूर्वीचे तंत्र निष्प्रभ ठरल्यामुळे उद्योगधंद्याचे नवे तंत्र आता उपयोगात आणावे लागेल.

फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलण्याच्या फंदात पडू नका. सध्याचे दिवस अनिष्ट आहेत याचा अर्थ सर्वत्र अपयश येईल असा नव्हे. प्रयत्नांची शिकस्त करावी लागेल. दुसरा पंधरवडा थोडाफार यशदायक.

दि. ७ ते ९, १४ ते १९, २३ ते २८ अल्पसे यश पदरी पाडून घेता येईल.

**कर्क** : महिनाभर मंगळ चौथा असल्यामुळे धावपळ-धडपड काही चुकेलशी दिसत नाही. एवढेच समाधान की, ती धावपळ वाया जाणार नाही. पराक्रमस्थ गुरू तुम्हांला मधूनमधून साहाय्य करील.

या महिन्यात महत्त्वाचे, साहसाचे असे काहीच न करणे चांगले. आरोग्य, पैसा, प्रतिष्ठा यांसंबंधी थोडीफार विवंचना जाणवायला लागेल. प्रत्येक गोष्ट करण्या-पूर्वी दहा वेळा तरी विचार करायला हवा. उद्योगधंद्याचे नेहमीचे तंत्र बदलले नाहीत तर अपेक्षाभंगाशिवाय दुसरे काहीच पदरी पडेलसे दिसत नाही. स्थावराच्या जुन्या व्यथा पुन्हा जाणवायला लागतील.

दि. १ ते ३, ११ ते १९, २६ ते २८ काहीसा अनुकूल काल.

**सिंह** : मंगळ पराक्रमातून संचारत असल्यामुळे, मध्यंतरीच्या साऱ्या अनिष्टतेवर पडदा पडेल आणि गतिमान जीवनाचा पुन: प्रत्यय यायला लागेल. या नव्या वर्षाच्या उदयाबरोबरच आपल्या कर्तृत्वाचे क्षेत्र विस्तारू लागल्याची आपणांस जाणीव व्हायला लागेल. आठव्या शनीची आता मुळीच पर्वा करू नका.

हा सारा महिना धावपळीचा, घाईगर्दीचा जाणवेल. बदली-बढतीची लक्षणे स्पष्ट-पणे दिसायला लागतील, नोकरीधंद्याचे घसरलेले गाडे मार्गावर येईल, सामाजिक क्षेत्रातील हुकलेली संधी पुन्हा लाभेल.

दि. २ ते ५, १४ ते १९, २५ ते ३० या काली अपेक्षा बऱ्याच प्रमाणांत सफल व्हाव्यात.

**कन्या** : मंगळ तुमच्या राशीतून गेला, ठीक झाले. पण या अवस्थेमुळे आपल्या साऱ्या योजना आकार घेऊ लागतीलच असे ठामपणे सांगता येणार नाही. शनी-राहूंचा विरोध जोपर्यंत आहे तोपर्यंत आपणांस जरा जुळतेमिळतेच घ्यावे लागणार आहे.

शक्यतो वादविवादाचे प्रसंग टाळा. राजकीय क्षेत्रात भाग घ्यायचे प्रकर्षाने टाळा. पैशा-अडक्याचे व्यवहार डोळ्यांत तेल घालून पाहा. तुमचा भोंगळपणा, अनवधानपणा अंगाशी आल्याशिवाय राहणार नाही. अनेकांचे सहकार्य घेऊन पुढे चला.

दि. ५ ते ८, १४ ते २०, २७ ते ३१ अनेक योजना यशस्वी होतील.

तूळ : गुरू बारावा आणि मंगळ पहिला म्हणजे आपल्या कर्तृत्वाला हे आव्हानच. अपयश येणार नाही पण ताण खूपच सहन करावा लागेल, व्यावहारिक पेचप्रसंग चातुर्याने सोडवावे लागतील, अनेकांचे साहाय्य घेतल्याशिवाय पुढे पाऊल टाकणे इष्ट ठरणार नाही.

मनात प्रक्षुब्ध व भडक विचार उठू लागतील. नको त्या माणसाचे पाय धरावे लागतील.

पहिला पंधरवडा थोडाफार अनुकूल जाणवेल. दुसऱ्या पंधरवड्यात सूर्य चतुर्थात येताच, अपेक्षाभंगासारखे काही चमत्कारिक प्रकार अनुभवावे लागतील. मंगल कार्याचे पुढे ढकला.

दि. ३ ते ५, १३ ते १९, २९ ते ३१ या काली आपले प्रयत्न काहीसे यशस्वी ठरावेत.

वृश्चिक : बाराव्या मंगळाची दखल घ्यायची गरज भासणार नाही. अकरावा गुरू तुम्हांला कोणत्याही गोष्टीची उणीव भासू देणार नाही. यांत्रिक स्वरूपाचे नवे कार्यक्षेत्र उभारण्याची संधी मिळेल. धनोत्पादनाचे नवे नवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील. नोकरीधंद्यातील प्रतिष्ठेचे स्थान विनासायास मिळेल. आपण कोणत्याही क्षेत्रात पाऊल टाकले तरी ते पवित्र्यात पडेल.

तुमच्या जीवनातील हा एक अपेक्षासाफल्याचा काळ आहे. हवे ते आणि हवे तेव्हा प्रतिज्ञेने मिळवू शकाल अशीच या वेळच्या ग्रहस्थितीची जडणघडण आहे. दुसरा सारा पंधरवडा अपेक्षेबाहेर यश देऊन जाईल.

दि. ५ ते ८, १५ ते २१, २६ ते २९ अपेक्षा सफल करणारा काळ हाच.

धनू : गेल्या सहामाहीत अनेक गोष्टींत तेजोभंगाचे—अपेक्षाभंगाचे प्रकार सहन करावे लागले. त्यामुळे तुमची जिद्द डिवचली गेली, तुम्हांला कालाने आव्हान दिले आणि म्हणूनच साऱ्या शक्तिनिशी आपण पाठपुरावा केलात त्यामुळेच जीवनात तुम्ही अयशस्वी ठरला नाहीत.

आता शनी मार्गी झाला, सूर्य-मंगळाशीही संगनमत झाले. आजवर शिकस्तीचा प्रयत्न करूनही जे घडू शकले नाही ते आता विनासायास घडून यायला लागेल.

दुसरा पंधरवडा तर पूर्णांशाने अपेक्षासाफल्याचा ठरेल. उद्योगधंद्याच्या क्षेत्र-विस्ताराने नोकरीतील अपेक्षित स्थान पदरी पडेल.

दि. ७ ते १३, १८ ते २२, २५ ते ३० अनेक योजना आकार घेऊ लागतील.

**मकर** : सध्या तरी निदान निसर्ग तुमच्यावर बेहद्द खूप आहे. प्रत्येक ग्रहाची बैठक अगदी हवी तशी आहे. या वेळी जे जे मनात आणाल ते ते अपेक्षेबाहेर यश घेऊन उठेल. सहज पाऊल टाकलेत तरी तो पवित्राच ठरेल.

नोकरीधंद्यात अनेक टप्पे ओलांडून पुढे जाल, कला–साहित्य क्षेत्रांत तुमचा बहुमान होईल. संशोधन क्षेत्रात कधी कुणाला मिळाला नसेल असा बहुमान मिळेल.

तुमच्या जीवनात हे एक महान् पर्व सुरू होत आहे. मंगल कार्याचे ठरेल स्थावराचा प्रश्न सुटेल, प्रगतीचे नवे मार्ग दृष्टिक्षेपात येतील.

दि. १ ते ५, १० ते १९, २५ ते २९ अनपेक्षितपणे अनेक चांगल्या गोष्टी घडाव्यात.

**कुंभ** : भाग्यस्थ मंगळाने तुमचे अनेक पेचप्रसंग सोडविलेले असतील, सोडवीलही. आठव्या गुरूबद्दल फारशी चिंता करू नका. यशस्वीपणाने साडेसातीमधून मुक्त झालात यातच तुमच्या कर्तृत्वाचे दर्शन घडते.

अवहेलना, उदासीनता, नैराश्य हे सारे इतिहासजमा झाले. आता नवीन काहीही करायचे ठरविलेत तर ते घवघवीत यश घेऊन उठेल. जबाबदारी वाढेल, थोडा ताणही पडेल, पण जगाच्या नजरा खिळून राहतील असे काही भव्यदिव्य हातून घडेल. पहिला पंधरवडा सर्वोत्तम प्रगतीचा जाणवेल.

दि. ४ ते ६, १३ ते २०, २५ ते २८ अपेक्षासाफल्याचा काल.

**मीन** : हा महिना थोडाफार स्वास्थ्याचा जाणवेल, पण ते जाणवणे फसवे आहे. मंगळ अष्टमात असताना अनूकल कालाची खोटी आशा दाखवण्यात काय अर्थ ? काही दिवस जपूनच पावले टाका. मुख्यत: अधिक काळजी घ्या प्रकृतीची.

दुसऱ्या पंधरवड्यात सूर्य एकादशात येताच अगदीच नडली अडलेली कामे गती घेऊ लागतील. थोड्याफार प्रमाणात पेचप्रसंग सुटू लागतील. दूरच्या प्रवासाचे टाळा.

दि. ३ ते ९, १९ ते २५ थोडाफार अनुकूल काल एवढाच. ○


# पुरंदऱ्यांची नौबत

**ब. मो. पुरंदरे**

मूल्य साडेतीन. रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणे २



# कस्तुरीचा गिलावा

ब. मो. पुरंदरे

वऱ्हाडच्या मातीत पिकतात मोती. इथली भुई फार उदार. मूठभर पेरलं तर परातभर मिळतं. वऱ्हाडी मन आणि वऱ्हाडी माती म्हणजे मोतीचुराची शेती. रुक्मिणीचं हे माहेर. अन्नपूर्णेचं हे सासर. इथून वाहतात पैनगंगा, ज्ञानगंगा, वर्धा, पूर्णा. दानाचे संकल्प सोडीत सोडीतच हे गंगोदक युगानुयुगं वाहतंय. ह्या गंगांचे काठ, पदर आणि पोत पैठणच्या पैठणीपेक्षाही जरतारी होते. सम्पन्न होते. प्रसन्न होते.

वऱ्हाडात एक सुंदर कारंजं आहे. कमळासारखं दळदार. आपले सारे साजशिणगार लेवून इथं ह्या कमळात लक्ष्मी नांदत होती. ह्या कारंज्यात धनदौलत

अपरंपार होती. लाड आडनावाची घराणी इथं वरीच होती. म्हणूनच ह्या शहराला म्हणत लाडांचं कारंजं. धनराज कुबेरांचं हे गाव, अन् विरक्त योगीराजाचंही हेच गाव. गुरुदेव नृसिंहसरस्वतींचं हे जन्मस्थान.

शहराला कोट होता. चौ दिशांना वेशी होत्या. वाडेहुडे प्रचंड होते. बाजारपेठा उदंड होत्या. विद्याभ्यासही प्रकांड होता. इथली तळघरं धनधान्यांनी तुडुंब होती. सुंदर सुंदर जैनमंदिरं इथं अनेक होती. कारंज्याच्या कुबेरांची कीर्ती दाहीदिशांत दरवळत होती. लाहोरापासून तंजावरपर्यंतच्या व्यापाऱ्यांची वर्दळ कारंज्यात असायची. मालाची ने आण करणाऱ्या लमाणांचे तांडे येत–जात असायचे. उंटांचे काफिले आठी दिशांनी आणि चारी वेशींनी कारंज्यात यायचे. कापडचोपड, सोनंचांदी, हिरेमोती, गालिचे, हत्यारं, औषधं, मेवे, अत्तरं, केशर अन् कस्तुरीसुद्धा.

असंच एकदा कारंज्याचं शिवार कस्तुरीच्या घमाघमाटानं धुंद झालं. सकाळची वेळ होती. आभाळ नुकतं उजळलं होतं. दोन्ही बाजूंच्या हिरव्यागार शेतीवाडीवर सुगंधी भुरळ घालीत घालीत ती कस्तुरी कारंज्याकडे चालली होती. घंटाघुंगरांच्या तालावर ती चालली होती. चार–पाच उंटांचा लहानसा तांडा संथ संथ पावलं टाकीत डुलत झुलत चालला होता. कस्तुरी उंटावर होती. अगदी आघाडीच्या उंटावर एक मातवर सौदागर बसला होता. त्याचा रुबाबच सांगत होता की हाच ह्या कस्तुरीचा मालिक. अगदी मागच्या उंटांवर प्रवासाचं सामानसुमान आणि दोन-तीन इसम होते. बहुधा नोकरचाकर. कस्तुरीचा व्यापारी कस्तुरी विकायला कारंज्यात निघाला होता. कस्तुरीच्या सुगंधाने सारे आसमंत धुंद झाले होते.

शहर आता अगदी जवळ आलं होतं. वेस दिसू लागली होती. त्याच वेळी त्याच रस्त्याने कुणी तरी एक माणूस पायी पायी चालला होता. तो कारंज्याकडेच चालला होता. कस्तुरीच्या घमघमाटाने त्या माणसाचे नाक आणि डोळे कुतूहलाने एकदम सौदागराकडे वळले. एक अक्षरही न बोलता आपल्या मालाचा जाहिराणा कसा आपोआप होतोय, या गोष्टीचा सौदागराला वाटणारा अभिमान त्याच्या चेहऱ्यावरच दिसत होता. स्वाभाविकच. त्याचा संबंध येणार बड्या बड्या वैभवशाली गिऱ्हाइकांशी. गाद्यागिरद्यांवर सौदे ठरत असणार. सदैव सुगंधात आणि

वैभवात राहण्याविहरण्याचं भाग्य त्याला लाभलेलं. दरिद्री लोकांशी कशाला संबंध येतोय त्याचा ? – पण आलाच ! आत्ताच आला. अगदी दरिद्री कपडे पेहेरलेल्या त्या रस्त्यावरच्या माणसाशी संबंध आला. त्या इसमाने उंटावरच्या सौदागराला विचारलं,

"कसला बाजार आहे उंटावर ?"

सौदागराचा अभिमान उगीचच डिवचला गेला. दाही दिशा सुवासाने कोंदून गेल्या असूनही हा दळभद्री पुसतोय, बाजार कसला म्हणून ! याला काय पडसं झालंय ? पण मग इच्छा नसूनही सौदागराने, तिरस्कारी नजरेने त्याच्याकडे बघत एक शब्द त्याच्यावर फेकला,

"कस्तुरी !"

"कस्तुरी ? काय भाव ?"

त्या दरिद्र्याने विचारला भाव ! कस्तुरीचा ! अंगाला धड वस्त्र नव्हतं अन् तो कस्तुरीचा भाव विचारत होता. देणं नास्ती, घेणं नास्ती, अन् ऐरावताची किंमत किती ! सौदागराला जरा चीडच आली. तो मनात म्हणाला असावा, या बेकार प्राण्याच्या गाडग्या मडक्यात चार कवड्या तरी असतील का ? कस्तुरी म्हणजे याला काय गाढवावरची माती वाटली ? उपहासाने बघत बघत सौदागर त्याला म्हणाला,

"करायचंय काय तुला रिकामा भाव पुसून ? सोन्याइतकी महाग आहे !"

"पण एकूण माल आहे किती ?"

अरेच्या ! हा भडभुंजा स्वतःला काय शाहजहान समजतोय की कुतुबशाह ? उगीच कटकट लावलीय्––

"आहे एक मण !"

"फक्त ?"

सौदागराचे डोळे या त्याच्या शब्दाने मोठावले. त्याची खात्रीच झाली की, हा प्राणी वेडसर असला पाहिजे. पागल !

"घेतली !"

त्या इसमाने सौदाच केला.

घेतली ? आता मात्र सौदागराला हसू आलं. त्याला गम्मत वाटली. घेतली म्हणे ! खरोखरच याने 'घेतलेली' दिसते ! अन् 'चढलेली'

पण दिसते ! सौदागराला ही सारी करमणूक वाटली. अन् मग त्याला वाटलं की, पाहू या तरी ही स्वारी काय काय गमती करते ती. सौदागर हसत त्या 'घेतलेल्या' प्राण्याला म्हणाला,

"रक्कम रोख ?"

"हुं !"

अन् मग त्या गिऱ्हाइकाच्या मागोमाग खरोखरच सौदागर निघाला. कस्तुरीगंध उधळीत उधळीत सौदागर मागोमाग चालला. वेशीतून शहरात तो सुवास प्रवेशला. प्रत्येकजण मंतरला जात होता. मुग्ध होत होता.

गिऱ्हाइकामागोमाग उंट चालले होते. रस्ते, गल्ल्या अन् बोळ ओलांडून गिऱ्हाईक एका आवारात शिरले. मागोमाग उंट. तिथं मोठं अंगण होतं. अंगणात चिखलाचा खूप मोठा गारा केलेला होता. शेजारीच एका इमारतीचं बांधकाम चालू होतं. बांधकामाचं सामानसुमान पडलं होतं. तिथंच् थोडं पलीकडे एक राहतं घर होतं. सौदागर उतरला. तो गृहस्थ त्या राहत्या घरात गेला. जाता जाता वळून त्याने सौदागराला बोलावलं. सौदागर अंदाज करीत होता आपल्या अजब गिऱ्हाइकाच्या पागलपणाचा. आजपर्यंत वीस-पंचवीस तोळे जातीत जास्त, कस्तुरी खरेदी करणारे श्रीमंत त्याने पाहिले होते. पण मणभर ? हे पहिलंच गिऱ्हाईक !

आपल्या ओसरीवर सौदागराला नेत गिऱ्हाइकानं त्याला विचारलं,

"काय किंमत झाली मणाची ?"

आता सोन्याइतकाच कस्तुरीचा भाव. सौदागरने मिस्कीलपणाने हसत हिशेब केला आणि भला मोठा आकडा त्याने सांगितला. त्यावर अगदी संथपणे गिऱ्हाइकाने विचारलं,

"कोणत्या शिक्क्याचे रुपये देऊ ? सुरती ? बऱ्हाणपुरी ? एलीचपुरी ? महमुदावादी ?"

आता सौदागर जरा चमकला. त्याला आश्चर्य वाटू लागलं. कुतूहल दाटू लागलं. त्याच्या चेहऱ्यावरच हसू थवकलं. तो म्हणाला,

"कोणत्याही शाही शिक्क्याचे चालतील मालक !"

'मालक' उठून आत गेले. थोड्याच वेळात तीन–चार नोकरांसह

बाहेर आले. प्रत्येकाच्या हातात जड जड थैल्या होत्या. थैल्या सौदागरापुढं टाकीत ' मालक ' म्हणाले,

" घ्या मोजून ! "

सौदागर थक्क झाला. ओशाळला. हा माणूस वेडा नव्हे, हा लक्षाधीश,– नव्हे नव्हे, हा कोटयधीश दिसतोय ! सौदागर लाजून चूर झाला. पण त्याच्या मनात हेही कुतूहल वाटलं की, हा एवढया कस्तुरीचं करणार तरी काय ? व्यापार ? सौदागराने हात जोडून नम्रतेने ' श्रीमंतांना ' विचारलं,

" मालिकसाहेब, माल कुठं आणून ठेवू ? "

यावर मालिक म्हणाले,

" ठेवायचाय कशाला ? लगेच वापरून टाकायचाय. "

मणभर कस्तुरी ' वापरून ' टाकायचीय ? म्हणजे ? सौदागराला आश्चर्याचे झटके बसत होते. तो कुतूहलाने श्रीमंतांकडे पाहत राहिला. तेव्हा आपल्या अंगणातल्या चिखलाच्या गाऱ्याकडे बोट दाखवीत तो गृहस्थ म्हणाला,

" ओता तुमचा माल त्या चिखलात ! "

सौदागरला आश्चर्याने हादरा वसला. हत्ती चिखलात गच्च रुतावा तसा तो चित्रासारखा मालकाकडे बघतच राहिला, इतकी मोलाची कस्तुरी चिखलात ओतायची ?

" ओता ! मला घराला गिलावा करायचाय ! अनायाशी मिळालीय ... "

सौदागराने कस्तुरीचे शिसे चिखलात रिते केले.

त्या गृहस्थाने आपल्या घराला असा सुगंधी गिलावा केला.

कस्तुरीची ही इमारत आता पडली आहे. पण कारंज्याच्या वैभवाची सुगंधी स्मृती मात्र शिल्लक आहे.

O

## संचालिका आणि संपादिका डॉ. सरोजिनी बाबर

(पृष्ठ १५ वरून)

आलेल्या पिढीजात लोकवाङमयाची ही साखळी तुटणार की काय ? निदान तसा धोका निर्माण झाला. काही सुज्ञांना–विशेषत: ग्रामीण भागांतून येऊन शिक्षित झालेल्या सुशिक्षितांना–याविषयी अधिक जिव्हाळा वाटू लागला. हे लोकसाहित्य कालप्रवाहात लुप्त होण्यापूर्वी ते राखून ठेवण्याची गरज निर्माण झाली. आणि मग शासनाचे दरवाजे ठोठावले गेले.

या प्रश्नासंबंधी आस्था असलेल्या मंडळींपैकी सरोजिनीताई एक. १९५५ च्या सुमारास त्यांनी विधानसभेत या प्रश्नाला वाचा फोडली. त्या वेळचे मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई यांच्याशी खाजगी चर्चा केली. शासनालाही या प्रश्नाची निकड जाणवली. आणि १९५५ मध्ये लोकसाहित्य समितीची स्थापना झाली. विद्यमान अध्यक्ष सरोजिनीताई मंडळाच्या प्रथमपासूनच सदस्य होत्या. मंडळाचे पहिले अध्यक्षपद क. चिं. ग. कर्वे यांच्याकडे होते.

### कार्यास सुरुवात

स्थापनेनंतर लगेच मंडळाने आपल्या कार्यास सुरुवात केली आणि कै. कर्वे यांनी संपादित केलेले 'महाराष्ट्र लोकसाहित्य' हे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. लोकगीते, लोककथा व संकीर्ण लोकसाहित्य यांचा या पुस्तकात समावेश करण्यात आला. याच पुस्तकाचा पुढील भाग १९५७ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला आणि या नंतर सरासरी प्रतिवर्षी एक या प्रमाणे समितीमार्फत पुस्तके प्रकाशित होऊ लागली. १९६१ नंतरच्या सर्व पुस्तकांचे संपादन सरोजिनीताईंनी केलेले आहे.

प्रारंभीच्या काळामध्ये समितीच्या कार्याची विशेष दखल घेतली गेली नाही. परंतु प्रतिवर्षी नवीन प्रकाशने बाहेर आल्याने कार्याचा पसारा वाढत चालला. प्रकाशित झालेल्या पुस्तकांतून अन्यत्र सहसा न मिळणारे काहीसे वेगळ्या स्वरूपाचे वाङमय वाचावयास मिळाल्याने वाचकवर्गही वाढत राहिला. शिवाय प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची छपाई, सजावट सुंदर असून किंमतीही माफक असल्याने इच्छुक वाचकाला प्रत विकत घेणेही फारसे जड गेले नाही.

प्रारंभीच्या काळात पुस्तकांसाठी साहित्य मिळवणे विशेष जड गेल्याचे सरोजिनीताईंनी सांगितले. ज्यांच्याजवळ काही सांगण्यासारखे आहे अशा मंडळींकडे त्यांच्या सोयीप्रमाणे जावे, त्यांच्याशी तासनतास गप्पा माराव्यात तेव्हा थोडेफार पदरी पडत असे. कित्येक वेळा नानाप्रकारे समजावून सांगूनही बायाबापड्या बोलत नसत. मग कुठे त्यांच्याबरोबर जात्यावर बस, शेणगोठा कर, आदी उद्योग करून त्यांना बोलके करावे लागत असे.

गावाकडच्या मंडळींना सुरुवातीला या उपक्रमासंबंधी अविश्वास होता. आपल्या-

जवळ जे आहे ते यांना कशासाठी पाहिजे हेही त्यांना समजत नसे. शिवाय ही शिकलीसवरलेली मंडळी आपल्यापेक्षा वेगळी ही भावना मनात असे. या सर्व अडचणी दूर करून त्यांच्यापर्यंत पोहोचणे हीच एक कौशल्याची बाब असे. परंतु एकदा का आपण विश्वास निर्माण करू शकलो, की मग मात्र अगदी रंगात येऊन आजीबाई आपली राखीव भजने, ओव्या सुरू करीत. त्यांची जागेवरच नोंद करून घ्यावी लागे. अशा पद्धतीने ताईंनी स्वत: अनेक ठिकाणांहून साहित्य गोळा केले आहे. त्यासाठी त्या खेडोपाडी जाऊन राहिल्या आहेत. खरे लोकजीवन प्रत्यक्ष अनुभवले आहे. त्याचे सूक्ष्म निरीक्षण केले आहे. आज या अडचणींची तीव्रता पुष्कळच कमी झाली आहे. हे साहित्य कशासाठी जमवले जाते, याची लोकांना कल्पना आली आहे. प्रसिद्ध झालेली पुस्तके ही त्यांना दाखवण्यात आली आहेत आणि अक्षरशत्रू असूनही या उपक्रमामागील आशय मात्र त्यांच्यापर्यंत पोहोचला आहे.

लोकसाहित्य समितीतर्फे आतापर्यंत १४ पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत. समिती महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण मंत्रालयाचे एक अंग असल्याने विक्रीची व्यवस्थाही शासनामार्फत होते. विविध खाजगी सरकारी संस्था, शाळा, महाविद्यालये वाचनालये, ही प्रामुख्याने ग्राहक असली तरी व्यक्तिगतरीत्या दुकानांतून अनेक ग्राहकांनी पुस्तके विकत नेली आहेत. त्यामुळेच तीनचार प्रकाशनांच्या दोन-तीन आवृत्त्या निघू शकल्या आहेत.

आवश्यक स्वरूपाचे एक कार्य या नात्याने शासनाकडून या उपक्रमाची हाताळणी होत असल्याने ज्या आकाराच्या पुस्तकाची बाजारात आज २५ ते ३० रुपये किंमत होऊ शकेल, असे पुस्तक केवळ सात-आठ रुपयांपर्यंत विकले जाते. उदाहरणादाखल 'राजविलासी केवडा' या पुस्तकाचा निर्देश करता येईल.

## संपादनाचे प्रमुख कार्य

नवीन प्रकाशनांचे काम तुलनेने आता सोपे झाले आहे. वृत्तपत्रांतून विषय जाहीर केले जातात आणि लोकांकडून त्या विषयावरील साहित्य मागवले जाते. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे वृत्तपत्रांतील आवाहनाप्रमाणे अनेक मंडळी साहित्य पाठवतात. आलेल्या साहित्यातून विषयाशी सुसंबद्ध असणारे साहित्य बाजूला काढले जाते. कित्येक वेळा एकाच स्वरूपाचे साहित्य अनेक मंडळींकडून येते. त्याची वर्गवारी करून निवड केली जाते. यानंतर निवडलेले साहित्य समितीच्या सभासदांपुढे ठेवले जाते. त्यांनी केलेल्या सूचनांचा विचार करून सरोजिनीताई संपादनाचे अवघड कार्य सुरू करतात. हे कार्य संपल्यावर पुस्तक प्रसिद्ध केले जाते.

ज्यांचे साहित्य प्रसिद्ध होते अशा मंडळींना कवितेस पानास तीन रुपये व गद्य लेखनास पानास पाच रुपये मोबदला देण्यात येतो. चित्रकारांना योग्य प्रमाणात मोबदला दिला जातो. याखेरीज प्रत्येक संबंधिताला त्याचे साहित्य प्रकाशित

झालेल्या पुस्तकाची एक प्रत भेट देण्यात येते.

लोकसाहित्य समितीच्या सदस्यांची व अध्यक्षांची शासनामार्फत चार वर्षांसाठी नेमणूक करण्यात येते. समितीच्या मार्गदर्शनाखाली साहित्य संशोधनाचे कार्य चालू राहते. सदस्यांना अथवा अध्यक्षांना पगार नसतो. त्यांचे काम सन्माननीय स्वरूपाचे असते. समितीचे कायम स्वरूपाचे कार्यालय पुण्यात असून तेथील पगारी मंडळीं-मार्फत दैनंदिन व्यवहाराचे कार्य चालते.

असा हा लोकसाहित्य मंडळाच्या कार्याचा पसारा. सरोजिनीताईंसारखी व्यासंगी जबाबदार व्यक्ती समितीच्या अध्यक्षपदी असल्याने कार्याचा व्याप झपाट्याने वाढला आहे. ताईंशी या संबंधात बातचीत केली असता, लोकसाहित्य संशोधनाची प्रेरणा त्यांना साने गुरुजींपासून लाभल्याचे समजते.

पुस्तक प्रकाशनाखेरीज समिती कशा स्वरूपाचे कार्य करते अशी विचारणा केली असता ताई म्हणाल्या : लोकसाहित्याच्या संशोधन–प्रसारकार्याबरोबरच काव्य, कथा, कहाण्या, म्हणी, उखाणे इत्यादींचे ध्वनिमुद्रणद्वारा जतन करणे, लोकसंगीत व लोकनृत्याचे कार्यक्रम सादर करणे, लोकसाहित्याचे प्रदर्शन भरवणे, या उपक्रमांद्वारा बरेच कार्य चालू आहे. आतापर्यंत सुमारे ३०० लोकगीतांचे व कथांचे ध्वनिमुद्रण झाले आहे. आकाशवाणीवरही समितीतर्फे कार्यक्रम सादर करण्यात आले आहेत. याखेरीज लोकसाहित्यविषयक संमेलने, प्रदर्शने भरवण्यात आली आहेत.

ताईंच्या नेतृत्वाखाली समितीचे कार्य सुकरतेने चालू आहे. समितीच्या त्या प्रारंभापासून सदस्य असून १९६० पासून समितीचे अध्यक्षपद त्यांच्याकडे आहे. बागनी, इस्लामपूर व अहमदनगर येथे माध्यमिक शिक्षण पूर्ण करून ताई पुण्याला आल्या. स. प. मधून मराठी व संस्कृत हे विषय घेऊन त्यांनी बी. ए. ला प्रथम-श्रेणीत प्रथम क्रमांक मिळवला. एम्. ए. लाही असेच उज्ज्वल यश संपादून ' स्त्रियांचे लिखित वाङ्मय ' या विषयावर संशोधन करून त्यांनी डॉक्टरेट संपादन केली. महाविद्यालयीन शिक्षणात त्यांना प्रा. श्री. म. माटे, प्रा. वाळिंबे व प्राचार्य सोनोपंत दांडेकर यांचे मार्गदर्शन झाले.

१९५२ साली कॉंग्रेसच्या तिकिटावर शिराळे मतदार संघातील निवडणूक जिंकून त्यांनी विधानसभेत प्रवेश केला. १९६४ मध्ये त्यांची विधान परिषदेमध्ये नेमणूक झाली आणि नुकत्याच झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीत त्यांची महाराष्ट्र विधानसभेतर्फे निवड झाली आहे. ताईंचे वास्तव्य दिल्लीत असले, तरी त्यांचे मन लोकसाहित्य समितीच्या कार्यात गुंतलेले असते. महाराष्ट्र शासनातर्फे जे अनेक अभिनंदनीय उपक्रम चालू आहेत, त्यांमध्ये लोकसाहित्य समितीच्या कार्याचा उल्लेख आवर्जून करावा लागेल. ○

होय. बलजित कौर माझी पहिली बायको आहे ! ती दोन्ही मुले माझीच आहेत ! मी दारू पितो ! पिणार ! आणि याद राख यातलं काही घरी कळता कामा नये. . .

* *

जयपाल कौरला परिस्थितीचा अंदाज आला ! पण फार उशिरा ! तिनं माहेरी लिहिलेल्या पत्रांमुळं लवकरच सबंध पंजाब हादरून जाईल असा भीषण खून आता होणार होता. . .

* *

# तो
# मी
# नव्हेच !

* *

ॲड. माधव कानिटकर
यांची नवी लेखमाला
पुढील अंकापासून सुरू होत आहे.

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd No. M H–649

# व्होल्गा
# जेव्हा
# लाल
# होते

वि. स. वाळिंबे । मूल्य रुपये अठरा

'लेनिन क्रांतीच्या ध्येयाने कसा भारावला होता याची कल्पना या ग्रंथावरून येऊ शकते. लेनिनच्या व्यक्तिजीवनातील भाग वाळिंबे यांनी चांगला रंगविला आहे व त्यामुळे लेनिन हा माणूस वाटतो, यंत्रमानव वाटत नाही. वाळिंबे यांच्या पुस्तकातील हा भाग उल्लेखनीय आहे. वाळिंबे यांची भाषा ओघवती आहे आणि ग्रंथ आकर्षक करण्यात ते यशस्वी झाले आहेत.............

**महाराष्ट्र टाईम्स**, ८ डिसेंबर १९६८

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७-बी, कोथरूड, पुणे ४, येथे छापून, ४१९